# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक १९-०६-२००८ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

गुरूवार दि.१९ जून २००८ (कार्यक्रम प.क्र.११) रोजी मा. महापौर सौ.विजया किशोर रहाटकर यांचे अध्यक्षतेखली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दुपारी १.२५ वा.वंदेमातरम या गिताने सुरू झाली सभेला मा.आयुक्त,नगर सचिव तसेच संबंधीत अधिकारी व खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

०१. स.स.श्री.वाघ भाऊसाहेब बाबुराव
०२. स.स.श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार
०३. स.स.श्री.संतोष सुधाकर जेजुरकर
०४. स.स.श्री.अशरफ मोतीवाला
०५. स.स.श्री.बमणे पुनमचंद सोनाजी
०६. स.स.श्री.सुरे सीताराम इसराम
०७. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब पुंडलिक
०८. स.स.श्री.नाहदी नासेर महमंद याहीया
०९. स.स.श्री.पांडे विनायक प्रभाकर
१०. स.स.श्री.दाभाडे मिलींद यशवंत
११. स.स.श्री.धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
१२. स.स.श्री.खान सलिम खान यासीन
१३. स.स.श्री.जगताप संजय उत्तमराव
१४. स.स.श्रीमती मसरद बेगम शरफोद्दीन
१५. स.स.श्री.गायकवाड दिलीप नारायण
१६. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१७. स.स.सौ.जोशी रजनी रमेश
१८. स.स.श्री.माळवतकर महेश शिवाजीराव
१९. स.स.श्री.अत्तरदे प्रकाश सुका
२०. स.स.श्री.जैस्वाल अनिल जुगललाल
२१. स.स.श्री.सोनवणे कचरू श्रीपती
२२. स.स.सौ.इंगळे शंकुतला सांडुजी
२३. स.स.सौ.रगडे सुशिला भगवान
२४. स.स.सौ.पाटील दिपाली सुनिल
२५. स.स.सौ.बेंद्रे विमल तुकाराम
२६. स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरीभाऊ
२७. स.स.श्रीमती खान अजरा जबीन मसुद खान
२८. स.स.श्री.मो.जावेद मो.इसाक
२९. स.स.सौ.मिटकर शोभा हरीश्चंद्र
३०. स.स.श्रीमती यास्मीन बेगम अब्दुल कदीर
३१. स.स.श्री.खान जावेद हसन कासिम हसन
३२. स.स.श्री.स.खुसरो बुऱ्हानोद्दीन

३३. स.स.श्री.अ.रशिद खान (मामु) हमीद खान
३४. स.स.सौ.लता श्रीनिवास दलाल
३५. स.स.श्री.पाटील नरवडे वसंत पांडुरंग
३६. स.स.श्री.रिडलॉन संजु सुग्रीव
३७. स.स.सौ.सिध्द वीणा गजेंद्र
३८. स.स.श्रीमती कुरैशी नजमा बेगम युनुस
३९. स.स.श्री.खान मुजीब मीर आलम खान
४०. स.स.श्री.खान निसार मोहमंद खान
४१. स.स.श्री.शेख इब्राहीम पटेल शेख इमाम
४२. स.स.श्री.हाजी शेर खान अ.रहेमान
४३. स.स.श्रीमती मुमताज बेगम वाहेद खान
४४. स.स.सौ.राऊत छाया विलास
४५. स.स.श्री.दत्ताभाऊ अण्णासाहेब पाथ्रीकर
४६. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
४७. स.स.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
४८. स.स.श्री.अमोदी अबुबकर बिन सईद
४९. स.स.श्रीमती शेख शमशाद बेगम शेख हफीज
५०. स.स.श्री.पटेल सलिम समशेर पटेल
५१. स.स.श्री.तुपे त्र्यंबक गणपतराव
५२. स.स.सौ.पोळ सरला सखाराम
५३. स.स.श्री.कटकटे सतिष विश्वनाथ
५४. स.स.श्रीमती खान जहुरबी नासेर
५५. स.स.सौ.बोरामणीकर कला सुरेश
५६. स.स.श्री.डॉ.कराड भागवत किसनराव
५७. स.स.सौ.मंगला प्रकाश गायकवाड
५८. स.स.श्री.रेणुकादास दत्तोपंत वैद्य
५९. स.स.श्री.सावंत मधुकर दामोधर
६०. स.स.सौ.रेखा कैलास काथार
६१. स.स.श्री.गांगे रविंद्र लक्ष्मण
६२. स.स.सौ.पाटणी हर्षमाला विजयकुमार
६३. स.स.श्री.खुडे विजय किसनराव
६४. स.स.श्री.संतोष खेंडके पाटील
६५. स.स.श्रीमती जयश्री सारंग किवळेकर
६६. स.स.श्री.शिंदे दामोधर माधवराव
६७. स.स.श्री.गांगवे बन्सीलाल तुळशीराम
६८. स.स.सौ.ससाणे सरिता अशोक
६९. स.स.श्री.भगवान (बापु) देविदासराव घडमोडे
७०. स.स.श्री.रवि साहेबराव कावडे
७१. स.स.श्री.डांगे बाबासाहेब लक्ष्मण
७२. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
७३. स.स.सौ.शिंदे पुष्पा बाळु
७४. स.स.सौ.वाघमारे पार्वताबाई विजय

७५. स.स.श्री.विसपुते शंशाक दामोधर
७६. स.स.श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
७७. स.स.सौ.कोंडेकर अंजली दिलीप
७८. स.स.श्री.जोशी संजय रामदास
७९. स.स.श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा
८०. स.स.श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग
८१. स.स.श्री.मोरे कचरू विश्वनाथ
८२. स.स.श्री.संजय पांडुरंग शिरसाट
८३. स.स.सौ.जैन अल्पा विकास
८४. स.स.श्री.बारवाल गजानन रामकिसन
८५. स.स.श्रीमती मोमीन सोफिया फिरदोस अय्युबखान
८६. स.स.सौ.अनिता नंदकुमार घोडेले

**<u>नामनिर्देशित पालिका सदस्य</u>**

०१. स.स.श्री.संजय किसनराव केनेकर
०२. स.स.श्री.राजेश (पप्पु) गुलाबचंद व्यास
०३. स.स.श्री.सुरजितसिंग सबरवाल
०४. स.स.श्री.सुरेंद्र माणिकराव कुलकर्णी

**<u>चर्चा :</u>**

श्री.संजय जोशी :या सभागृहाचे स.सदस्या श्रीमती मिराबाई रामराम शिंदे यांचा मुलगा स्व.विजय रामराव शिंदे यांचे तसेच स.सदस्य श्री.संजय सिरसाट यांचे वडील स्व.पांडुरंग सिरसाट यांचे नुकतेत दुखद निधन झाले त्यांना सभागृहातर्फे दोन मिनीटे श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

श्री.रेणुकादास वैद्य :यास माझे अनुमोदन आहे.श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

मा.महापौर : ठिक आहे सर्वांनी श्रध्दांजलीसाठी उभे रहावे.

याचवेळी स्व.पांडुरंग सिरसाट तसेच स्व.विजय शिंदे यांचे दुखद निधन झाल्याने सभागृहातर्फे दोनमिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

डॉ.भागवत कराड :या महापालिकेला शासनाने नवीन आयुक्त म्हणून श्री.दिलीप बंड हे रूजू झालेले आहे आज ते सभागृहात उपस्थित असून त्यांचे सभागृहाच्या वतीने मा.महापौर यांनी पुष्पगुच्छ देवून स्वागत करावे.

मा.महापौर :या महापालिकेला नवीन आयुक्त यांनी पदभार स्विकारलेला आहे. सभागृहात उपस्थित असून सभागृहाच्या वतीने त्यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत करते.

याच वेळी नवनियुक्त मा.आयुक्त श्री.दिलीप बंड यांचे मा.महापौर व स.पदाधिकारी यांनी पुष्पगुच्छ देवून स्वागत केले.

श्री.मुजीब खान :चर्चेसाठी वेळ दयावा नंतर विषयपत्रिका घेण्यात यावी.

मा.महापौर :चर्चेसाठी अर्धा तासाचा वेळ देण्यात येतो.

श्री.मुजीब खान :पावसाळयाचे दिवस आले. नाले साफ होत नाही नाल्याच्या बाजूला असलेले रहिवासी यांना पावसाळयात त्रास होतो तसेच ३-४ चार महिण्यापासून वार्डातील नागरीकांना चार-चार दिवस पासून पाणी

मिळत नाही. रस्त्याच्या साईडचे गटारी साफ होत नाही अतिक्रमण मोहिम हाती घेतली. गरीब लोक नाल्याच्या कडेला राहतात. शाळा सुरू झाल्या गरीब लोक मुलांचे शिक्षण प्रतिकुल परीस्थितीत करतात. शहर स्वच्छ असावे सर्वांची भावना आहे आहे परंतू शाळा व पावसाचे दिवस असल्यामूळे अतिक्रमण मोहिम तुर्त चार महिणे थांबवावी. पावसाळयात कुणाचेही घर पाडू नये असे शासनाने सुध्दा दोन वर्षापूर्वीचे आदेश आहे.

याच वेळी अतिक्रमण मोहिम थांबवू नये अशी सभागृहात मोठमोठयाने

बोलण्याचा आवाज येत असतो.

श्री.मुजीब खान :जे काढले जात आहे ते गरीबांचे आहे पावसाळा आहे तोपर्यत त्यांना सवलत दयावी.चार महिणे थांबवावे.अतिक्रमण काढायचेच असेल तर लेआऊट मधील खुल्या जागेवरील तसेच परवानगी दिलेल्या व्यतिरिक्त जास्त काम केले. परवानगी एकीकडे ओपनस्पेस दुसरीकडे आहे. तळ मजल्यातील संपूर्ण जागा बिल्डरनी बांधकाम करून विक्री केल्या. कोणत्या लेआउट मधून किती भाग दिला हे दाखविण्यास नगररचनाचे कर्मचारी तयार नसतात. मोठमोठे बिल्डर व यातील लोक हे सुध्दा त्यात सहभागी आहे. आपण हाती घेतलेल्या कार्यवाही सोबत आम्ही आहोत.

श्री.सलीम खान :अतिक्रमण मोहिममूळे गोरगरीब लोकांचे नुकसान होत आहे.काढणार असेल तर सर्व भागातील काढावे.जे मत स.सदस्य श्री.मुजीब खान यांनी मांडले त्यासी मी सहमत आहे चार महिणे मोहिम थांबावावी.काही ठिकाणच्या लोकांवर अन्याय होत आहे काही ठिकाणी होणे बाकी आहे. तो थांबवावा. अतिक्रमण काढण्यास विरोध नाही परंतू गोरगरीब लोकांचे नुकसान करू नये.कोणत्या रस्त्यावरील अतिक्रमण काढावे मा. न्यायालयाचे आदेश आहे त्याची प्रत सर्वांना देण्यात यावी. अधिकारी बरोबर चर्चा करीत नाही मा.आयुक्तांची दिशाभूल करीत आहे. सभागृहाला विनंती की गरीब लोकांच्या बाबतीत विचार करून ही मोहिम तुर्त थांबवावी.

श्री.गजानन बारवाल :नवीन आयुक्त यांनी अतिक्रमण मोहिम हाती घेतली त्याबध्दल त्यांचे अभिनंदन करतो. त्यांनी स.सदस्यांना तसे पत्र देवून सहकार्य करावे म्हणून कळविले सर्व सदस्यांनी सहकार्य केले ते असणारच आहे बीॲण्डसी कार्यालया समोरील अतिक्रमण हटवावे म्हणून १० महिण्यापासून मागणी करतो कार्यवाही केली नाही. कोकणवाडी भागात महापालिकेच्या जागेवर अतिक्रमण अनेक वेळा मागणी करूनही काढले जात नाही हे सुध्दा अतिक्रमण काढावे.

श्री.विनायक पांडे :अतिक्रमण मोहिम हाती घेतली त्याबध्दल नवीन आयुक्त यांचे अभिनंदन मोहिम थांबविणार असेल तर सुरू करायला नको होती.पूर्ण शहर स्वच्छ झाल्याशिवाय मोहिम थांबवू नये.हे पर्यटन स्थळ असून जगातील लोक येथे येतात.या शहरात अनेक ऐतिहासीक स्थळे आहे व शहरातील संपूर्ण अतिक्रमण काढून हे शहर अतिक्रमणाच्या विळाख्यातून मुक्त व्हायलाच पाहिजे. मागे

स.तनवाणी साहेब महापौर असतांना अतिक्रमण काढले. परत हातगाडया उभे राहतात. घाटीत पेशन्टला न्यायला जागा नसते. सर्वच प्रशासनाला सहकार्य करीत आहे यापूढेही करावे अशी विनंती करतो.

श्री.देसरडा प्रशांत : सर्व जनतेच्या नगरसेवकांच्या वतीने अतिक्रमण मोहिम सुरू केल्याबध्दल मा.आयुक्तांचे अभिनंदन करतो. अमुक ठिकाणचे काढावे असे अनेकांची पत्रे येतील. शहरातील कुठलेही अतिक्रमण असेल ते काढावे सर्व प्रशासनाच्या पाठीशी आहे. नवीन आलेले आयुक्त चार महिणेच आहे अशी चर्चा होते आहे. या कामासाठी ४ महिणे पुरेल का, चार महिणेपेक्षा जास्त काळ त्यांनी रहावे. संपूर्ण अतिक्रमण काढावे.व हे शहर अतिक्रमणातून मूक्त करावे. याच बरोबर नाल्याची साफसफाई व इतर विकास कामे सुध्दा झाली पाहिजे. सेवांचे धाडसी निर्णय पुर्ण करावे.

श्री.अ.रशिद खान :१९९९ मध्ये तिबेटी लोकांना हटवावे आम्हाला जागा दयावी म्हणून काही लोक उपोषणास बसले होते.तिबेटी लोक मा. न्यायालयात न्याय मागण्यासाठी गेले जे टपरी धारक होते ते गेले नाही. २००२ ला मा.न्यायालयाने निर्देश दिले की ३० फुट ते १०० फुट रस्त्याच्या आतील सर्व टपऱ्या हटवाव्या. आज काम सुरू झाले.चेलीपुरा शहागंज गाडी १-२ तास जाम होते. जर कुणावर अन्याय होत असेल तर योग्य नाही लोक बेरोजगार होतील. ७ लोकांना परवानगी आहे. त्यांना रस्त्याच्या बाजूला जागा असेल तर देण्यास हरकत नसावी.रस्त्यामध्ये येणारे कुणाचेही अतिक्रमण असेल तरी हटवावे दुमत नाही.रंगारगल्लीचा रस्ता ५० फुट रूंद करावा महापालिकेने ४० फुट करण्याचा निर्णय घेतला त्या रस्त्यावर काही लोकांना परवानगी ही दिली पुन्हा मा.सर्वोच्च न्यायालयाने ५० फुटाचा करावा म्हणून आदेशीत केले.आता १०-१० फुट रूंद करावा लागेल. काढणार असेल तर सर्वांचेच काढावे व्यापाऱ्यांना कुठे ॲडजस्ट करता येत असेल तेथे करावे. घाटी दवाखाना रस्त्याच्या फुटपॉथवर लोकांनी पत्रे टाकून घरे केली. तेथे लोक राहतात. त्यांचेवर अन्याय होणार नाही याचा ही विचार करावा जे लहान व्यवसाय करणारे गरीब लोक आहे त्यांचेवर अन्याय न करता पर्यायी जागा कुठे देवू शकतो का याचा ही विचार केला पाहिजे.

श्री.संजय जगताप :प्रशासनान अतिक्रमण हटाव मोहिम राबवित आहे त्याबद्दल अभिनंदन परंतू चार महिणे पावसाळा असल्याने गोरगरीबांचे व्यवसाय होत नाही उपासमारीची वेळ आली या काळात स्थगिती दयावी.रेल्वेस्टेशन येथील अतिक्रमण काढतांना पक्षपात केला गेला एक कटलरीचे दुकान काढले बाजूचेच देशी दारूचे काढले नाही. शहरातील रंगारगल्ली, गुलमंडी समर्थनगर कोणताही भाग असेल पक्षपात न करता सर्वच काढावे.नसता आंदोलन केले जाईल.

सौ.लता दलाल : मा.आयुक्तांचे प्रथम अभिनंदन अनेकांनी मुद्दे मांडले, रास्त असतील. १९८२ पासून या शहराची लोकसंख्या झपाटयाने वाढत आहे. रस्ते रूंद असणे आवश्यक आहे. रस्त्यावर मोठया प्रमाणात

अतिक्रमण झाले पायी चालता येत नाही. अपघात होतात अतिक्रमण हटविले जात आहे येथे वावरणा-या नागरीकासाठी हा चांगला निर्णय घेतलेला आहे. पावसाळा सुरू झाला असला तरी पाउस पडलेला नाही नाल्याची चांगल्या प्रकारे साफसफाई होत नाही ती करण्याची कार्यवाही व्हावी. जेणे करून पावसाचे पाणी बाजूच्या वसाहतीत जाणार नाही. याची दखल घ्यावी.

श्री.मनमोहनसिंगओबेरॉय:मोहिम सुरू केल्याचे नवीन आयुक्ताचे स्वागत केले कुणी मोहिमेला विरोध करीत आहे. कार्यवाही आवश्यक आहे. कर्तबगार अधिकारी चांगले काम करीत असेल तर करू दयावे.आपण जनतेची बाजू घेवून मत मांडावे. पुन:र्वसनाची योजना आखावी लोक हसत येतील. लोकांची व्यवस्था केली पाहिजे. नुसते गोरगरीबांचे काढणे योग्य नाही..एकीकडे अनेक जागा बिल्डरला बीओटीसाठी देवून लाखोची उलाढाल होत आहे पेपरला येते.बीओटीवर जागा देण्यास नागरीकांचा विरोध आहे असे असतांना थांबविले जात नाही.टप-या काढून गरीबांना बेघर करीत आहे ज्यांच्या काढल्या जात आहे त्यांना पर्यायी मध्यठिकाणी जागा निश्चित करून टपरीसाठी जागा दयावी जे अशी अशी सिस्टम दिल्लीमध्ये केलेली आहे.हे ही काम महापालिकाचेच आहे. १९७८ ते १९९० पर्यत ५००-१००० टपरी I स्कीम नुसार दिल्या त्या लिगल आहे. सन २००२ मध्ये नोटीफिकेशन काढले. लोक सुशिक्षित नव्हते म्हणून कोर्टात अप्रोच झाले नाही. सर्व लिगली आहे काढणार असेल तर पर्यायी जागा दयावी अशी मागणी करणारे मा.न्यायालयात कुणी गेले नव्हते.असते तर जरूर न्याय मिळाला असता.ती झालेली चूक आज सहन करावी लागत आहे.हा प्रश्न सोडवीण्याची जबाबदारी महापौराची आहे.डीपी रोडवर असलेले शासकीय जागेवरील अतिक्रमण महापालिका काढू शकते.खाजगी काढायचे झाल्यास कायदेशीर अडचण येईल तज्ञाचा सल्ला घेवूनच कार्यवाही करावी. सर्व अधिकार आयुक्तांना दयावे वाटाघाटी करून कार्यवाही करतील अंदाधुदी कारभार चालवीत आहे अशी भावना कुणाची होवू नये.शहाबाजार सराफा गल्लीत वाहने जात नाही. रेल्वेस्टेशनचे काढत आहे ऑलरेडी १२० फुटाचा रस्ता आहे. ३० फु.रस्ता ५० फु. करायचा अशा रस्त्यावरील अगोदर काढावे.जातीवादाचे वातावरण कमी होईल.ज्या ही ठिकाणचे काढले जाईल याची माहिती मा. महापौर मा.सभापती ,स्थायी समिती यांना दयावी.

डॉ.भागवत कराड : नवीन आयुक्त अतिक्रमणे काढण्याचा धाडसी निर्णय घेतला तो योग्य असून हे ऐतिहासीक शहर आहे रस्त्यावर टप-या हातगाडया उभ्या राहत असेल तर कालांतराने रस्त्यावरून चालणे अडचणीचे होईल.डीपी रोड पानदरीबा रंगारगल्ली लक्ष्मणचावळी रस्ता असेल हे रूंद करण्याची गरज आहे. टीडीआर ,एफएसआय लागू झालेला आहे. त्यानुसार कार्यवाही करावी. ही मोहिम थ्रांबविली तर पुन्हा सुरू करणे अवघड होईल. मोहिम थांबवू नये.काढलेल्या अतिक्रमणाची माहिती मा.महापौर मा.सभापती स्थायी समिती यांना

दयावी. आणखी जे जे रस्ते रूंद करायचे त्याची माहिती घेवून कार्यवाही करावी.

मा.महापौर :एका वेळेस एक सदस्यांनी यावर थोडक्यात मत मांडावे.

श्री.सय्यद खुसरो :मोहिम हाती घेतली चांगली बाब आहे. डीपी रोडवरील १०-१० वर्षापूवी काही लोकांना जागेचा मोबदला दिला असतांना ते लोक तेथून गेले नाही ते अगोदर हटवावे. चेलीपुरा, मंजूरपुरा येथे पैसे घेतलेले आहे. व ते तेथेच बसलेले आहे. बीओटीवर साफसफाईचे काम दिले स्वच्छता बरोबर होत नाही. सहा.संचालक नगररचना श्री.राठोड साहेब यांची बदलीवर दुसरे अधिकारी आले ते सभागृहात उपस्थित नसतात. हे योग्य नाही. पुर्णवेळ अधिकारी असावे त्या बाबतीत कार्यवाही करावी.

सौ.खान अजरा जबीन :अतिक्रमण हटविण्यापूर्वी त्या लोकांना सामान स्थलांतर करण्यासाठी वेळ दयावा त्यांचेवर अन्याय होणार नाही यासाठी त्यांना पर्यायी जागा देण्याचे निश्चित करावे जेणे करून त्यांचेवर उपासमारीची वेळ येणार नाही. बेरोजगार गुन्हेगारी कडे जात आहेत. सभेची वेळ ११.०० वा व सुरू होते दुपारी १.०० वाजता सभा वेळेवर सुरू व्हावी सभागृहाच्या वतीने विनंती करते. अनेक विकास कामाच्या बाबतीत चर्चा करता येईल.

श्री.रेणुकादास वैद्य : प्रत्येक जण दुसऱ्या वार्डाचे काढतात. मी माझ्या वार्डापुरते बोलेल. माझ्या वार्डात अतिक्रमण मोहिम राबवावी रस्त्यावरील अतिक्रमणा बरोबरच ओपनस्पेस वरील अतिक्रमणे काढावी. अशी अतिक्रमणे ही प्रशासकीय विभागाच्या निष्काळजीपनाने झालेली आहे लोक त्यास टॅक्स लावण्याचा प्रयत्न करतात ते रेग्यूलर होते महापालिकेची जागा लोकांच्या अशा प्रकारे लोकांच्या घशात जाते.अशा अतिक्रमणाच्या बाबतीत टीम तयार करावी विशेष लक्ष द्यावे व माझे वार्डापासून सुरूवात करावी.

श्री.कैलास गायकवाड: अतिक्रमण काढण्याचे काम जे होत आहे त्या व्यतिरिक्त सन २००२ मध्ये मा. उच्च न्यायालयाने जे पार्कीगच्या जागे संदर्भात निर्देश दिले. नामांकित बिल्डरनी पार्कीगच्या जागेवर अतिक्रमण केले त्यामूळे शहरातील सर्व वाहतूक व्यवस्थ विस्कळीत झाली.आजही अनेक वाहने रस्त्यावर उभी असल्याचे दिसून येते अशी अतिक्रमणे केंव्हा पाडणार आहे. खुलासा घ्यावा.

श्री.संजय जोशी : मोहीम राबवल्या गेली. फोटो आले. प्रशासनाकडून मापक अपेक्षा आहे रस्त्यावरील अतिक्रमणे हटविले जाते तसेच अनेक लोकांनी महापालिकेला जागा दिली त्यांचा मोबदला घेतला पर्यायी जागा दिल्या त्या रस्त्यावर मार्कीग झाली असे असतांना अशा ७-८ रोडवरील त्या लोकांनी पक्की दुकाने घरे बांधून तेथेच स्थायीक आहे.याची दखल घेण्यात यावी. अत्यावश्यक सुविधासाठी महापालिकेने अनेक जागा घेतल्या अशा जागांवर महापालिकेचे नाव लावण्याचा मागे निर्णय झालेला होता. ४० टक्के जागेवर अतिक्रमण झालेले आहे यावरील अतिक्रमण काढून तारकुंपण करून महापालिकेचे त्या जागेवर बोर्ड लावावे.

श्री.नासेर नाहदी :मा.आयुक्त यांचे अभिनंदन करतो पुढील कामास शुभेच्छा देतो.जसे अतिक्रमणाच्या बाबतीत आहे पाणी व रस्त्याच्या बाबतीत ही प्रश्न आहे. खाम नदी माझे वार्डातून उगम होतो. हर्सुलचे तलाव भरल्यानंतर खालच्या वसाहतीत पाणी जावून नुकसान होते. दोन वर्षापासून यावर बोलतो सदर लोकांना सवलत देवून या नदीच्या बाजूला संरक्षित भिंत करावी. नाला साफ करावा यापुर्वीचे आयुक्त यांनी या कामासाठी १.५० कोटी टेंडर काढले होते. काम सुरू करावे नंतर बजेट दिले जाईल असे म्हटले होते. परंतु ते बजेट कोणत्या कामासाठी खर्च केले समजायला मार्ग नाही काम अर्धवट आहे. या बाबतीत प्रशासनाने दखल घ्यावी.

मा.महापौर : स.सदस्यांनी आपले म्हणने थोडक्यात सांगावे मुद्यांची पुनःरावृत्ती करू नये.

श्री.संतोष खेंडके :अतिक्रमण मोहिम राबवित आहे त्याबध्दल प्रशासनाचे अभिनंदन.गजानन महाराज मंदीर चौक ते एन-४ जयभवानी चौक पर्यतच्या रस्त्यावर मोठे अतिक्रमण आहे. रस्त्यावरील दिवे चालू नसल्यावर सायंकाळी तेथून जाता येत नाही. गजानन मंदीर हे धार्मीक स्थळ असून येथे व्यवसाय करणारे यांचेत जातीय वादातून वाद होतात.

श्री.संजय केनेकर :अतिक्रमण मोहिम राबवित असल्याबध्दल नवीन आयुक्त यांचे अभिनंदन करतो. वाघासारखे आयुक्त लाभले अशी चर्चा आहे. परंतू ते वाघासारखे खरच असतील तर त्यांनी उंदरावर छापा नको. निजाम राजवटीच्या अधिपत्त्याखाली हे बसलेले शहर आहे. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांची मुले येथे २० x३० प्लॉटमध्ये स्थायीक झ ालेली आहे. असे नागरीक मोठया व्यापाऱ्याकडे खरेदी साठी जात असतात.लहान व्यवसाय करणारे गरीब लोक त्यांचेच काढले जात आहे मोठमोठया व्यापाऱ्याचे काढावे महापालिकेच्या जागेवर अनेक बिल्डरांनी अतिक्रमण केले नुतनकॉलनीत एक मोठे अतिक्रमण झाले त्यांची संचिका मिळत नाही. बंजारा कॉलनीतही मोठमोठे अतिक्रमण केले मोठमोठ्या बिल्डरचे अगोदर काढावे.

सौ.मोमीन सफिया फिरदोस : अतिक्रमण मोहिम राबविली जाते आनंदाची गोष्ट आहे.जे ४२ टप-या काढल्या पर्यायी जागा देण्यात यावी.वार्ड क्र. ९६ मध्ये महापालिकेच्या विद्युत खांबात विद्युत प्रवाह आल्याने मो.आसिफ मो.रज्जाक यांचे निधन झाले.सदर मुलाच्या नातेवाईकांना ५ लक्ष रू. आर्थीक मदत देण्यास मान्यता दयावी.

सौ.पुष्पा शिंदे :अतिक्रमणा प्रमाणेच पिण्याचे पाण्याचा बिकट प्रश्न आहे. पावसाचे दिवस आले. नाल्याची साफसफाई व्यवस्थीत होत नाही काढालेली घाण मटेरियल नागरीकांच्या घरासमोर पडलेले असते एन-२ या भागातील पाणी जयभवानी भागातील नाल्यात येते यामूळे जीवीत हानी होवू शकते.या बजेटमध्ये प्रशासकीय प्रस्ताव होवून सुध्दा तरतूद केली नाही.अतिक्रमण मोहिम सुरू केली चांगली गोष्ट आहे रस्त्याचे काम सुरू होते कुणीतरी स्थगिती आणते यास जबाबदार कोण असा प्रश्न येतो.जयभवानी नगरमध्ये शिवाजी पुतळा ते

रेल्वेस्टेशन असा डीपी रोड आहे आशिया खंडातील सर्वात जास्त झपाटयाने वाढणारे हे शहर आहे. मुकूंदवाडी येथे मध्यवर्ती रेल्वेस्टेशन असून कोणतीही विकासाची कामे तेथे केली जात नाही.ग्रामीण भागातील वास्तव्य असल्या सारखे दिसते.

श्री.हिम्मतराव दाभाडे:नवीन आयुक्त रूजू झाले त्याचे सभागृहाच्या वतीने अभिनंदन अतिक्रमण हटवितांना गरीब श्रीमंताचा भेदभाव येत नाही.शहर सुंदर स्वच्छ व्हावे सर्वाची भावना आहे वार्ड क्र.९० मध्ये पीरबाजार व मुथीयान कॉर्नर येथे महापालिकेची जागा आहे. मुथीयान कॉर्नर जागेवर श्री.माधवराव घोरपडे यांनी संरक्षित भिंत असतांना १.८२ लाख जागेचा मोबदला दिला असतांना अतिक्रमण केले.तीन वर्षापासून मुद्या मांडतो कार्यवाही केली नाही.ज्या ज्या वेळी मुद्या मांडतो त्या वेळी संबधीत लोक माझे विरूध्द पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करतात.या जागेच्या संदर्भात स्थायी समितीमध्ये अहवाल दिला होता त्यात सदर बांधकाम परवानगी चुकीने दिलेली आहे असे म्हटले होते.सदर जागेवरील झालेल्या बांधकामाची सखोल चौकशी करून कार्यवाही व्हावी. ती महापालिकेची जागा आहे. दुकाने उभे आहेत.

श्री.वसंत नरवडे :अतिक्रमण हटवितांना गोरगरीब लोक असेल त्यांचे रोजीरोटीचा प्रश्न येतो. त्यांना पर्यायी जागा देण्यात यावी.ही मोहिम थांबवू नये.हे शहर झपाटयाने वाढत आहे.इतर राज्यातील नागरीक येथे स्थायीक होत आहे.डीपी रोडवरील अतिक्रमण काढावे प्रत्येक रस्त्यावर अतिक्रमण आहे. वर्षभर मोहिम चालू ठेवावी.हे काढातांना भेदभावपणा प्रशासनाने ठेवू नये अतिक्रमण होण्यास कुणाचा हात आहे असा प्रश्न येतो. यासाठी जबाबदारी निश्चित केली पाहिजे त्याशिवाय यावर नियंत्रण येणार नाही. या बरोबर शहरातील नाले, पाण्याचा,ड्रेनेजचा प्रश्न असेल यावर ही चर्चा करून माहिती घेतली पाहिजे.विकास कामे होत नाही कोणता निधी वापरणार आहे. पॉलीसी काय ठरविणार आहे ठेकेदार काम करीत नाही त्यांना बिल दिले जात नाही. अशा बाबीकडे प्रशासन लक्ष देणार की नाही.बजेटची परीस्थिती व वार्डात होणारी कामे यावर माहिती घ्यावी एक दिशा ठरवून वार्डातील लाईट पाणी व ड्रेनेजचे कामाच्या बाबतीत प्रशासनाने दखल घ्यावी.अतिक्रमण काढतांना गरीब श्रीमंत भेदभाव ठेवू नये. सर्वाचेच काढावे. बजेटनुसार विकास कामे केंव्हा सुरू होतील या बाबतीत प्रशासनाने आढावा घेवून सर्व सदस्यांना कल्पना दयावी. कार्यक्रम आखावा.

श्री.अनिल जैस्वाल :ही मोहिम हाती घेतली त्याबध्दल आयुक्ताचे सर्वप्रथम माझ्या वतीने अभिनंदन हे ऐतिहासिक शहर असून ते स्वच्छ व सुंदर दिसावे सर्वांचीच भावना आहे.आंबेडकर नगरला लागून एक अतिक्रमण झालेले असून त्यामूळै दोन तीन वेळा अपघात होवून दोन व्यक्तीचा मृत्यू झालेला आहे सदर अतिक्रमण त्वरीत काढावे.

श्री.प्रल्हाद निमगांवकर:मल्हारचौक ते तिरूपती विहार या भागात पावसाचे पाणी लोकांच्या घरात जाते. मा.आयुक्तांनी पाहणी केली होती सदर काम

करण्यासाठी ३० लक्षची तरतूद केली टेंडर केले.कुणी घेत नाही पुन्हा पुन्हा टेंडरला येते सदर काम कुणास तरी देवून सुरूवात करावी. मेहरनगरमध्ये महापालिकेच्या सर्वे न. ५२/१,५२/२ एका व्यक्तीने अतिक्रमण केले मा.न्यायालयात प्रकरण चालू आहे.माहिती विचारली असता विधी विभागाकडून त्या संबधीची कागदपत्रे नाही अशी उत्तरे येतात.त्या जागेला संरक्षित भिंत केलेली असून लोखंडी गेट बसविलेले आहे. सदर जागा तात्काळ महापालिकेच्या ताब्यात घ्यावी.

श्री.नारायण कुचे :मुकूंदवाडी भागात महापालिकेचे निलंबीत कर्मचारी भरत जैस्वाल यांनी १००x५० जागेत १३ बांधलेल्या खोल्या हया अतिक्रमनात येतात. दोन वर्षापासून मागणी करतो काढले जात नाही.

सौ.यास्मीन बेगम :माझे वार्डात स्लम भाग असून पाण्याच्या त्रास आहे. गटारची साफसफाई होत नाही. तसेच हर्षनंगर मध्ये नाल्याची साफसफाई केली जात नाही. सिटीचौकजवळ नाल्यात ड्रेनेजचे पाणी वाहत आहे. नमाजसाठी जाणा-या नागरीकांना त्रास होतो. याची त्वरीत दखल घेवून संबधीत अधिकारी यांना आदेशीत करावे.

श्री.मिलींद दाभाडे :अतिक्रमण गोरबरीबांचेच काढले जाते याच बरोबरच जे बिल्डरनी पार्कीच्या जागेवर बांधकाम केले गाडया रस्त्यावर उभ्या राहतात याकडे प्रशासन लक्ष देणार काय? तत्कालीन आयुक्त यांचे कार्यकाळात विकास कामाच्या नावाखाली मोठा भष्टाचार झाला निकृष्ठ काम झाले. त्याकडे नवीन आयुक्त लक्ष देणार काय खुलासा घ्यावा.

सौ.कला बोरामणीकर:नवीन आयुक्त यांनी अतिक्रमण मोहिम सुरू केल्याबध्दल त्यांचे सभागृहाच्या वतीने प्रथमतः अभिनंदन करते. समर्थनगर निरालाबाजार परीसरात रस्त्यावर बिल्डरांनी मोठे अतिक्रमण केले आयुक्तांनी जातीने लक्ष देवून काढावे व रस्ता मोकळा करावा.दि.१५-१२-०६च्या बैठकीत ठराव क्र. ६७ घेतला त्याची अमबजावणी का झाली नाही. मा.न्यायालयाची स्थगिती असतांना पॅनलवरील वकील लावून त्या लोकांवर गुन्हा दाखल केला त्या वकीलाची यादी देण्यात यावी.ठरावातून धोरण स्पष्ट झाले असतांना या संदर्भात किती वकील हेरींगसाठी उपस्थित होते.अशा प्रकरणाचा निकाल लागेपर्यत किंवा स्थगिती मिळाल्यानंतर नियमानुसार दिलेले स्टॉल तोडणार काय?

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :अतीक्रमणाच्या बाबतीत ज्यांचा गैरसमज झाला असेल तो त्यांनी काढून टाकावा.आम सभेने निर्णय घेतल्याचीच अमलबजावणी प्रशासन करीत आहे.सभागृहाने जे निर्णय घेतले त्याकडे प्रशासनाने लक्ष दयावे. अतिक्रमण काढणे म्हणजे जात धर्माचा प्रश्न येत नाही. मानसिकता असते. पहिल्यांदा रस्त्यावरील नंतर महापालिकेच्या जागेवरील अतिक्रमण कुणी केलेले असेल तरी काढण्यात यावे. सर्वांना समान धरले जाईल कुणावरही अन्याय होणार नाही याचीही दखल घ्यावी.

श्रीमती शेख शमशाद बेगम:अतिक्रमण मोहिम राबविणे चांगले असून गोरगरीब लोकांचा यात विचार झाला पाहिजे.इंदिरानगर बायजीपूरा भागात दर्गाच्या बाजूला मोठे अतिक्रमण झाले ते काढावे अनेक वेळ पत्र दिले तेथे दवाखाना,शदीखाना करता येईल. कार्यवाही केली नाही. बारी कॉलनीत गटार असून घाण झालेली आहे साफसफाई होत नसल्याने लोकांच्या घरात पाउस पडल्यानंतर पाणी जाते.याकडे लक्ष देण्याची गरज आहे.

श्री.काशिनाथ कोकाटे :विकास कामाचा चार महिण्याचा आढावा घेतला तर सर्व कामे बंद असल्याचे दिसून येईल. ठेकेदाराची बिले दिली जात नाही म्हणून काम बंद आहे अशी माहिती आहे.बील मिळणे व काम करणे हे एकमेकाशी निगडीत आहे परंतू निविदा काढली जाते त्यात ज्या अटी शर्तीनुसार त्या ठेकेदारानी कामे करायला पाहिजे.जी कामे चालू होती ती सर्व बंद आहे. आर्थिक निकष, कामे बंद आहे. नवीन वसाहतीतही टॅक्स लागलेला असून सिडको व इतर भागातून अनेक लोक टॅक्स भरणा करतात. असे असतांना जनतेसाठी वार्डातील विकास कामे बंद ठेवणे, न होणे योग्य होणार नाही.बजेट नुसार कामे होत नसेल तर अर्थ नाही.३१ मार्चपासून विकास कामे बंद आहे व पेमेन्टही दिले जात नाही.जकातीचे फिक्स उत्पन्न दर आठवडयाला येते सिडको नवीन वसाहत व एमआयडीसी भागातून ३.५० कोटी कर वसूल झाला जकात खाजगीकरण केले तेथील कर्मचारी कराच्या वसूलीसाठी देवून सक्षमपणे वसूली करणार होते.असे असतांना उत्पन्न येत नाही म्हणून विकास कामे करता येत नाही याकडे मा.आयुक्त यांनी लक्ष देण्याची गरज आहे.विकास कामे मोठया गतीने सुरू करावी. वसुलीकडे लक्ष देण्याची गरज आहे.

श्री.संजय सिरसाट :तत्कालीन मा.आयुक्त यांचे जातांना अभिनंदन केले सभागृहात निरोप दिला नवीन मा.आयुक्तांचे पदाधिकारी यांनी स्वागत केले येणारे नवीन अधिकारी मी किती सक्षम आहे त्या प्रकारचे पेपरमध्ये स्टेटमेंन्ट असते आलेल्या आयुक्तांनी ४-५ नेत्यांची नावे घेतली त्या सर्वांचे सहकार्य मिळाले त्यामूळे मी सर्व काही काम यापूर्वीच्या ठिकाणी करू शकलो सर्व माझे पाठीशी आहे हे आपण लक्षात ठेवा असा सूर सर्वांना सोडला असे म्हणणे वावगे होणार नाही.येणारे मा.आयुक्त यांच्या आवडी निवडी काय त्यांनी काय काम कशा पध्दतीने करू शकतात या बाबत माहिती घेतात आलेल्यांना प्लीज कसे करायचे येथील अधिकाऱ्यांना माहित आहे ते सर्व आयुक्तांच्या पाठीशी राहतील.मा.आयुक्तानी अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली. ५० कोटीची कामे करू शकतो १२५ कोटीचे स्पील ओव्हरची कामे आहे.दोन वर्ष लागतील त्यातून ५० कोटी निघते ते सुध्दा देण्यामध्ये जाणार आहे.अशी माहिती बैठकीत आयुक्तांना दिली गेली तर विकास कामे कशी करायची हा प्रश्न प्रशासलाना पडला असेल.चार महिणेच मा.आयुक्त येथे आहे चर्चा झाली परंतु हा शासनाचा निर्णयावर आहे दोन वर्षही राहू शकतो असे ठामपणे म्हटले. बजेटची परीस्थिती व काम करता येणार नाही अशी माहिती

अधिका-यांनी दिली बजेट तर नाही आलेल्या आयुक्तांनी काहीतरी काम केले पाहिजे म्हणून अतिक्रमण मोहिम सुरू केली व्हिजीटच्या ठिकाणी हातवारे करतांना आयुक्तांचे छायाचित्र आलेले आहे ही पूर्वीचीच येथील पध्दत आहे.अतिक्रमण काढलेच पाहिजे ही भावना सदस्यांची असते म्हणून आम्ही तेथे येत नाही.त्या ठिकाणी आम्ही येत नाही.एकदा काढलेले अतिक्रमण पुन्हा तेथे होवू नये याकडे लक्ष दिले पाहिजे. शंहागज मधील अतिक्रमण काढले दुस-या दिवशी पोलीसानी जशाच्या तसे बसविले असे फोटो येते याला अर्थ नाही. जातीच्या अधारावर राजकारण केले जाते हे योग्य नाही. रेल्वेस्टेशनमधील अतिक्रमण काढले त्यात ९९टक्के हिन्दुचे होते माझे वार्डातीलही काढले ते काढायचेच होते म्हणून मी तेथे गेलो नाही. काढणार पुन्हा बसणार विषय संपेल असे होवू नये.तत्कालीन आयुक्तांना अनेक वेळा निदर्शनास आणून दिले. त्यांचे आमच्या कल्पना विचीत्र होत्या गेलेल्या व्यक्तीला वाईट बोलू नये.असे म्हणतात.त्यांनी नवीनच पायंडा पाडला शहरातील हातगाडया चालविणारे यांना लायसन्स देवू कितींना दयावे याचे लिमीट ठेवले नाही १० हजार लोकांना ३६५ रू फिस घेवून लायसन्स दिले.सर्व रस्त्यावर आले तर हातगाडीचे शहर म्हणून गणना होईल या शहरात झोनींग नाही. क्रांतीचौक मध्ये १०-१२ एकर जागा महापालिकेची आहे ४२ लक्ष एनए म्हणून जिल्हाधिकारी कार्यालयात भरणा केले भाडे वर्षाला २६ हजार येते.ते ही बंद झाले अशी माहिती आहे.ही जागा मिळवीली तर खुप आनंद होईल. १२ एकर जागा ताब्यात घ्यावी या ठिकाणी ज्यांचे काढले जाते त्यांचेवर अन्याय होत असेल तर त्यांना येथे जागा दयावी. अनेक ठिकाणी घरासमोर हातगाडी लावून देतात त्यांचेकडून १००रू रोजचे घेतात कुणीकुणावर उपकार करीत नाही.जी मोहिम सुरू केली ती थांबवू नये. पुर्वीचे आयुक्त यांनी पहिल्यांदा कडक भुमिका घेतली नंतर नमतेने घेत गेले तसे होवू नये. कोणताही धर्म असेल जात असेल भेदभाव करू नये.सतोंषी माता मंदीर काढले काल शहागंज मध्ये एक मदीर काढले कुठेही भेदभाव होवू नये.सर्व सदस्य आपल्या पाठीशी आहे.

श्री.अशरफ मोतीवाला: जे अतिक्रमण काढले गोरगरीब लोक बेरोजगार झालेले आहे गरीब लोकांकडे न पाहता मोठमोठे बिल्डर यांनी अतिक्रमण केलेले आहे पार्कींगच्या जागेवर अतिक्रमण केले याकडे लक्ष देण्याची गरज आहे शहरात पिण्याचे पाणी एक दिवसा आड पुरवठा केला जातो परंतू लोकांना ८-८ दिवस पाणी मिळत नाही. पुर्वीप्रमाणे रेग्यूलर पाणी यावे.

श्री.संतोष जेजूरकर :कुठलाही भेदभाव न करता शहरातील सर्व अतिक्रमणे काढण्यात यावी.

मा.महापौर :अतिक्रमणाबद्दल स.सदस्यांनी जे मुद्ये मांडले मांडले त्या बाबतीत प्रशासनाने खुलासा करावा.

मा.आयुक्त : मी येथे आल्याबध्दल तसेच चार पाच दिवसात केलेल्या अतिक्रमणाच्या कार्यवाही बद्दल ज्या भावना व्यक्त केल्या ते ऐकुन घेतल्या माझे अभिनंदन केले त्याबध्दल मी आपला सर्वांचा आभारी आहे. घर,दुकान पाडतांना प्रशासनाला व कुणालाही चांगले वाटत नाही. आपण नगरसेवक व आम्ही अधिकारी म्हणून काम करीत आहोत.सर्वाचे काम एकच असून हे शहर सुंदर स्वच्छ असावे त्यास महाराष्ट्रातच नव्हे तर जगात मान्यता मिळावी सर्वांचाच थोडाफार खारीचा वाटा असावा त्या भुमिकेतून आपण सर्व पूढे जातो. आलो तेंव्हा मुख्य रस्त्याने जात असे प्रेसने विचारणा केली. असता चांगले रस्ते असल्याचे मत मी दिले.जेंव्हा शहरात आतल्या भागात जात असतांना त्या ठिकाणी त्याचे चित्र फार वेगळे आहे मिळून बदलायचे सर्वांचे सहकार्य मिळण्याची गरज आहे. अतिक्रमण शिवाय इतर महत्वाची कामे आहे आहे.वार्डात स्वच्छता,पिण्याचे पाणी, चांगले रस्ते या तीन बेसीक सुविधा असणे आवश्यक आहे.या व्यतिरिक्त उद्यान असेल तर चांगलेच आहे.प्राधान्याने या सुविधा पुरविणे महापालिकेची जबाबदारी आहे.उर्वरीत नंतरच्या सुविधा येतात.डीपी प्लॅनमध्ये रस्त्याची रूंदी मोठी दाखवली असून ते मोठे करण्यास अडचण येते. रस्ते हे पूर्ण पणे सार्वजनिक मालमत्ता असून त्याचा वापर लोकांनी रहदारीसाठीच करायचा असतो.हे सर्व मान्य आहे या संदर्भात मा.उच्च न्यायालय व मा.सर्वोच्च न्यायालयाचे तसे आदेशपण आहे त्यासाठी मुख्य रस्त्यावर जर अतिक्रमण असेल तर ते काढण्याची जबाबदारी ही आपल्या सर्वांचीच आहे.पुर्वी कुणी लक्ष दिले कुणी दिले नाही या खोलात जाण्याची गरज नाही परंतु यापूढे आपण सर्वांनी मिळून नियोजन करावे की सर्व रस्ते हे विकसीत झाले पाहिजे.यापूढे अतिक्रमण होवू नये यात काही गरीब लोकांचे नुकसान होते हेही प्रशासनाला मान्य आहे तेथे रोजी रोटी कमवतो हा सुध्दा तेवढाच महत्वाचा मुद्दा येतो.या शहरात हातगाडी फेरीवाले यांची गरज आहेच दारावर आलेली भाजी ताजी असते ती घेतली पाहिजे हे सर्वांनाच वाटते.त्यासाठी हॉकर्स झोन करण्याची पॉलीसी ठरवावी लागेल.लहान लहान गोष्टीकडे लक्ष केंद्रीत केले व महापालिकेकडे पैसे नाही म्हणून हे काम थांबविण्याचे नाही.तशीही करू शकतो.या शहरात स्वच्छतेचा एकदरींत खूप अभाव जाणवला कर्मचा-यामध्ये उदासिनता दिसून आली.जसे आताच म्हटले अमुक काम झाले पाहिजे ठेकेदाराने काम केले पाहिजे. त्याच बरोबर लोकांची मानसिकता बदलणे सुध्दा आवश्यक आहे.प्रत्येक व्यक्ती आपआपले घर स्वच्छ ठेवतो हे आपण नेहमीच बघतो. जमा केलेला कचरा शेजारच्या घरात किंवा दारात टाकते ही मानसिकता बदलायला पाहिजे. त्यासाठी ओला कचरा व सुका कचरा कुठे टाकायचा त्यांचे वर्गीकरण करावे लागेल. कचरा कोठे टाकायचे याचे धोरण ठरवावे लागेल. कोणतेही काम लगेच १०-१५ दिवसात होणार नाही. आपण सर्व प्रशासनाबरोबरच आहात त्याबद्दल सर्वांचे आभार मानतो. माझी प्रायमरी रिस्पॉन्सलिटी आहे की पारदर्शकता

असावी. माझे स्टॉफला मॉरल सपोर्ट देणे व त्यांचेकडून काम करून घेणे धोरणात्मक निर्णया प्रमाणे कामाचा अग्रक्रम ठरवून त्याप्रमाणे काम करण्यात येईल शहरातील सर्व महत्वाचे रस्ते डीपी रस्त्याचे अगोदर काढले जाईल ज्यांनी अतिक्रमण केले असेल ते त्यांनी स्वत:हून काढावे. संपूर्ण रस्त्याचे भूसंपादन केलेले आहे व रस्ते महापालिकेच्या ताब्यात आहे. त्यामूळे कुणाचा मालकीहक्क येत नाही सरळपणे काढू शकतो. काही ठिकाणी भूसंपाद झाले नाही. जागा ताब्यात घेतल्या नाही. जागा लोकांना पैसे दिले नाही. काल मी पेपरमध्ये निवेदन दिले आहे ते आज आलेले आहे. त्याची प्रत आपल्याकडे दिली जाईल तीन प्रकारचे भुसंपादनाचे प्रस्ताव असू शकतात. भुसंपादनाचे पुर्वीचे बरेचशे प्रकरण रेंगाळलेले आहे. ते होवू नये म्हणून अशा प्रकारची भुमिका पिंपरी चिंचवड महापालिकेत घेतली होती. कारण भुसंपादनासाठी कोटयावधी रक्कम लागेल १० वर्षाचे बजेट मध्ये भागणार नाही. महापालिकेने ठराव करून घेतला एफएसआय टीडीआरच्या बदल्यात ताबे घ्यावे. निवेदन दिले आहे की डीपी प्लॅनचे डिमार्करेशन करून देत आहोत. त्यानंतर कुठपर्यंतचा भाग काढून घ्यायचे हे कळेल. अशा रस्त्यात ज्यांची जागा येत असेल त्यांना एक पत्र देवून त्याची पोच घेवून त्यांना मोबदला एफएसआय किंवा टीडीआर देवून ताब्यात घेवू शकतो. पहिले प्राधान्य रस्त्याला देणे आहे. बिल्डरांनी अनेक ठिकाणी अनधिकृत बांधकाम केले. मोठमोठया खुल्या जागा नाल्याच्या जागा गिळकृंत केलेल्या असेल तर महापालिकेच्या मालकीच्या जागेवर अतिक्रमण झाले असेल तर ते कुणाचेही असो काढावेच लागेल. रस्ता रूंदीकरणाचे काम हाती घेवू शकतो राज्य शासनाचे निवासी वापराचे असेल ते पावसाळयात काढू नये असे निर्देश आहे. रस्त्यावरील काढू नये असे आदेश नाही. जेवढी ही मोहिम जास्तीत जास्त राबविणार तेवढे शहराच्या नागरीकांच्या दृष्टीने चांगले राहणार आहे. यासाठी लोकांची मानसिकता बदलायला हवी. चार दिवसात बघीतले इतर ठिकाणचे ही अनेक लोकांनी अतिक्रमण स्वत:हून काढून घेतले आहे. जि.परिषद कॉर्नरला खूप टपऱ्या होत्या आज एकही टपरी दिसून येत नाही. कार्यवाही होते हे लोकांना माहित झाले पाहिजे परंतु त्यास संधी देणे गरजचे आहे ती संधी त्यांनी घेतली नाही तर प्रशासनाने पूढे जायलाच पाहिजे. तशी भुमिका प्रशासनाची असणार आहे. दुसरे असे की अनधिकृत बांधकाम हे शहरात खुप आहे ते तोडण्याच्या मागे लागलो तर अडकवू शकतो ते न होता मार्ग काढत पूढे जायचे आहे.पहिली भुमिका ही ठेवली की महत्वाचे रस्ते कसे ताब्यात घेणार दुसरे असे की अनधिकृत बांधकाम रेग्यूलर कसे करता येईल. फारच चुकीचे झ ाले असेल तर तेथे रस्ते कसे टाकता येईल मोठे होत नसेल तर ६ मी. रस्ते कसे करता येईल हे बघावे लागेल. या बाबतीत आपण सर्व एकत्रित येवून पॉलीसी ठरवू प्रशासनाचे आपल्याला नेहमीच सहकार्य असणार आहे येथे किती दिवस राहणार निश्चित नाही.

तिकडे जरी असलो तरी येथे येणाऱ्या अधिकाऱ्यावर माझे कन्ट्रोल असणारच आहे. हे शहर चांगले स्वच्छ करायचे एकदा ठरले ते व्हायलाच पाहिजे. ही तुमची आमची सर्वांची भावना आहे दुसरा पाण्याचा प्रश्न भेडसावणार शहराची लोकसंख्या १० लक्ष पेक्षा जास्त झालेली आहे.पाण्याची योजना ही ११० एमएलडी ची आहे प्रत्यक्षात कमी पाणी पोहचते. ते कसे पुरवठा करतो एक दिवसा आठ पाणी ते ही कमी दिले जाते सुधारणा आवश्यक आहे. पर्वाच मा.मुख्यमंत्री यांचे सोबत या योजने संदर्भात चर्चा केली पाण्याच्या योजनेची माहिती घेतली आहे. पुणेच्या एका एजन्सीने पिंपरी चिंचवड येथे काम केले होते त्यांना मी बोलवून घेतले येथील अधिकाऱ्या बरोबर त्यांनी पाहणी केली. काही त्रुटी/सुधारणा केल्या यास केंद्र शासनाकडून मान्यता मिळणे आवश्यक आहे. ते करण्याचे सांगितले नंतर तो प्रस्ताव मान्यतेसाठी देतो. कन्स्ल्टन्टला नेमू त्या एजन्सीला केंद्र शासनाने निधी येईल. मोठा निधी येईल कोणताही पक्षपात आपण न आणता पाण्याची योजना आपल्याला जनतेच्या साठी मंजूर करून आणावी लागेल. त्यांची अंमलबजावणी तातडीने करावी लागेल तरच या शहराला चांगले रूप येईल तिसरा मुद्दा जल:निस्सारणचा आहे पुर्ण शहरात कुठेही जलनिस्सारणास ट्रिटमेंन्ट करून शुध्द केलेले पाणी नदीला सोडण्याची पध्दत नाही. या बाबतीत सुध्दा शहरातील जनतेच्या दृष्टीने यास प्राधान्य देणे गरजेचे आहे. त्यासाठी प्लॅनींग करणे गरजेचे आहे. घनकचरा विल्हेवाट संदर्भात थोडेफार काम चालू आहे.त्या बाबतीतही पुढाकार घेतला जाईल माझे अभिनंदन केले पुन्हा मी आपले आभार मानतो. मा.महापौर यांनी सुध्दा सुरवातीपासून सर्वांच्या भुमीका कशा असतील हे स्पष्ट केले होते. नेहमी म्हटले जाते की पहिले पाऊल कसे पडते हे फार महत्वाचे असते. या संदर्भात मी लेखी सुध्दा दिले होते की अतिक्रमण १२ तारखेला काढायचे आहे. ते ११ तारखेला काढणे सुरू केले. उत्साह जास्त होता. मी नांदेडला होतो आता प्रश्न येणार नाही. पहिले अपयश फार महागात पडत असते आता अडचण येणार नाही फुटपाथ बांधले आहे लोकांनी अँगल लावून व्यवसाय सुरू केले असे असेल तर ते बांधले कशासाठी प्रेसवाले येथे आहे पुढील आठ दिवसात फुटपाथवरील अतिक्रमण ज्यांनी त्यांनी काढून घ्यावे. नसता ते काढून सामान जप्त केले जाईल. यात कुणाचे नुकसान नाही जेथे कुणाचे राईटच नाही खूप ठिकाणी असे चित्र आहे कार्यवाही केली जाईल. आपले सर्वांचे सतत सहकार्य असावे.

श्री.मुजीब खान :शहरात अनेक मोठमोठे बिल्डरांनी खुल्या जागेवर अतिक्रमण केलेले आहे. जे लेआऊट केले परवानगी दिली खुल्या जागे बाबतीत खुलासा केलेला नाही.

श्री.मिलींद दाभाडे :बिल्डर लोकांनी पार्कींगच्या जागेवर मोठमोठे अतिक्रमण केले. त्या बाबतीत खुलासा केलेला नाही.

मा.आयुक्त :आताच खुलासा केला महापालिकेच्या मालकीची जी जागा असेल तेथे अतिक्रमण असेल तर ते काढले जाईल त्यात पार्कींगही येईल.

मा.महापौर :जवळपास दोन तासापासून या विषयावर चर्चा चालू आहे. हा विषय जिव्हाळयाचा होता त्यावर अनेक सदस्यांनी चर्चा केली. मा.आयुक्त यांचे सभागृहाच्या वतीने मी अभिनंदन व स्वागतही करते. प्रशासनाला आदेशीत करते की शहरातील अतिक्रमण हे शाप आहे. कोणत्याच अतिक्रमणाचे समर्थन करता येणार नाही. कुठेही भेदभाव न होता सर्व ठिकाणचे अतिक्रमण काढण्यात यावे. पथकामध्ये अतिशय पारदर्शकता असावी. अतिक्रमण काढतांना कुणावर अन्याय होणार नाही याची दक्षता प्रशासनाने घ्यावी. एकदा अतिक्रमण काढल्यानंतर पुन्हा त्या ठिकाणी अतिक्रमण होणार नाही याची विशेषतः दखल घ्यावी. व आवश्यक त्या जागेवर डांबरीकरण खंडीकरण किंवा बोर्ड लावायचे असेल ती कार्यवाही करावी. यात नाले सफाई हा एक महत्वाचा विषय आहे. अतिक्रमण काढण्यासाठी सर्व अधिकार मा.आयुक्तांना देण्यात येते. सदस्यांनी म्हटल्याप्रमाणे जेथे अतिक्रमण झालेले आहे त्याची सर्व नोंद झाली आहे ते सर्व काढण्यात यावे. नाले सफाईचे काम संबंधीत विभागाने त्वरीत हाती घ्यावे. व काढलेले मटेरियल पून्हा नाल्यात जाणार नाही याची प्रशासनाने जातीने दखल घ्यावी. पाणी प्रश्नाचा मुद्दा मांडला या संदर्भात मा.आयुक्त यांनी दखल घेतली एका खाजगी एजन्सीला बोलून माहिती घेतली प्रशासन यात जातीने लक्ष घालतील आताच म्हटले की केंद्र शासनाकडून निधी घेवून हा प्रश्न मार्गी लावू त्याबद्दल त्यांचे सभागृहाच्या वतीने स्वागत करते. सभागृहाने दिलेला निर्णय हा सर्वांचाच असतो हे आवर्जुन सांगावेसे वाटते. जी ठेकेदाराची बिले थकीत आहे ती देण्याचे प्रयत्न करून वार्डात जास्तीत जास्त विकास कामे कसे सुरू होतील याकडे लक्ष देण्यात यावे.

श्री.सतीश कटकटे :८८,८९ मध्ये रस्ता रूंदीकरण केले संतोषी मातेचे मंदीर होते ते काढले त्यास पर्यायी जागा देणार होते दिली नाही.

श्री.अ.रशिद(मामू) : डीजीटल बोर्ड ही काढण्यात यावे.

मा.महापौर :या बाबतीत प्रशासनाने लक्ष द्यावे. हे शहर स्वच्छ व सुंदर दिसेल हे सर्वांनाच चांगले वाटेल. त्यासाठी जे जाहिरातचे फलक व होर्डीगचे बोर्ड असतील तेही सर्व काढण्यात यावे कोणताही भेदभाव व दिरंगाई प्रशासनाने करू नये.

याच वेळी मा.आयुक्त शासकीय कामा निमित्ताने सभागृहाच्या बाहेर निघून जातात त्यांचे जागी उपआयुक्त (प्र.)यांनी आसनग्रहण केले.

श्री.प्रशांत देसरडा :प्रश्न क्र.१९ देवून प्रत्येक वार्डात किती नळ कनेक्शन व मालमत्ता आहे माहिती मागविली असता पाणी पुरवठा विभागाने वार्ड कार्यालय वाईज माहिती दिली अशी माहिती नको वॉर्ड वाईज द्यावी. मालमत्ता विभागाने या बैठकीला माहिती देवू शकत नाही असे पत्र देवून कळविले माहिती केंव्हा मिळणार आहे.

मा.महापौर :आताच विचारलेल्या प्रश्ना बाबत प्रत्येक वार्ड निहाय माहिती आलेली नाही ती पूढील बैठकीत प्रशासनाने ठेवावी.

श्री.प्रशांत देसरडा :मॅन पावर घेवून प्रशासनाने माझे प्रश्नाचे उत्तर त्वरीत दयावे.

**विषय क्र. २३६ :**

दिनांक १९.०४.२००८ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

मा.महापौर : विषय मंजूर.

**ठराव :**

दिनांक १९.०४.२००८ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणेस मान्यता देण्यांत आली.

**विषय क्र. २३७ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मौलाना आझाद शिक्षण संस्थेचे अध्यक्षा यांनी पत्र देवून कळविलेले आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेचे मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्राचे समन्वयक पदावर त्यांच्या संस्थेचे औरंगाबाद कॉलेज फॉर वूमेनचे प्राचार्य डॉ.मोहम्मद ऊमर मोहम्मद जमाल यांची प्रतिनियूक्ती करण्यात यावी. डॉ.मोहम्मद ऊमर मोहम्मद जमाल यांची प्रतिनियूक्ती मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्रावर समन्वयक पदावर झाल्यानंतरही त्यांचे पगार,भत्ते,व त्यांना अनुज्ञेय सेवा संदर्भातील फायदे त्यांची संस्थाच देणार असल्यामूळे, त्यांची सेवा महानगरपालिकेला मोफत मिळणार आहे. महानगरपालिकेस त्यांना पगार,भत्ते द्यावे लागणार नाही. डॉ.मोहम्मद ऊमर मोहम्मद जमाल यांना शैक्षणिक कामाचा अनुभव असल्याने त्यांच्या सेवेचा संशोधन केंद्रास फायदा होणार असल्यामूळे, त्यांना मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्राचे समन्वयक या पदावर ते रूजू झाल्यापासून प्रतिनियूक्तीने नियूक्त करण्यासाठी प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.नासेर नाहदी : मौलाना आझाद शिक्षण संस्थेचे पत्र आले. डेप्युटेशनवर महापालिकेने मागणी केली होती काय? विना मोबदला कुणाची नियुक्ती करण्याची गरज काय? त्यांनी पत्र देवून मागणी केली नियमात आहे का? काम कुठे कुणाच्या अंडरमध्ये व कोणते काम करणार आहे ते व्यवस्थापकीय संचालक यांच्या अंडरमध्ये काम करतील किंवा कसे. त्यांचे गोपनीय अहवाल कोण लिहणार आहे माहिती दयावी.

श्री.रेणुकादास वैद्य :कुठल्यातरी संस्थेचे कर्मचारी या ठिकाणी घेणे योग्य नाही.या इमारतीत समाजासाठी शहरातील नागरीकासाठी चांगले उपक्रम राबविल्या जावे असे सुरूवातीला ठरले त्यासाठी अशा व्यक्तीची नियुक्ती करावी प्रस्ताव ठेवला वृत्तपत्रात जाहिरात दिली तर अनेक सेवाभावी संस्था असे काम करून देण्यात पुढे येतील.यापेक्षा चांगले अनुभवी लोक मिळू शकतात परंतू एखादयाने मागणी केली म्हणून मागणी मान्य करून त्यास मंजूरी देणे हे कितपत योग्य आहे.पेपरमध्ये जाहिरात देवून अर्ज मागवावे नियमानुसार मुलाखत वगैरे व अटी शर्तीच्या अधीन राहून या पदावर नियुक्ती करावी. या प्रस्तावास मंजूरी देण्यात येवू नये.

सौ.अजरा खान :या शहरातील कुणी दुसरे व्यक्ती काम करण्यास पात्र ठरत नाही काय महापालिकेतील कर्मचारी या पदावर काम करण्यास पात्र ठरवू

शकतात. हे पद निर्माण करून कार्यवाही करू शकतो.इतर दोन रिसर्च सेंन्टरमध्ये बाहेरील लोकांची नियुक्ती माझ्या माहिती प्रमाणे केलेली नाही येथेही करू नये. नियमानुसार मुलाखत वगैरे घेवून कार्यवाही करावी.

श्री.हिम्मतराव दाभाडे:बाहेरचे घेण्यास कुणी पत्र देवून नियुक्ती करावी अशी मागणी कुणी करीत असेल तर ते योग्य नाही हा महापालिकेचा निर्णय आहे महापालिकेनेच निर्णय घ्यावा.

श्री.अ.रशिद खान :यापूर्वी सर्वसाधारण सभेत ठराव मंजूर केला होता सौ.शबनूर बेगम म्हणून कर्मचारी काम करीत आहे.त्यांना रेग्यूलर करावे. इतर बाहेरचे घेण्याची गरज नाही.एक ग्रथपाल व एक डीटीपी ऑपरेटर घ्यावे. हा प्रस्ताव रद्य करावा.

श्री.भगवान घडमोडे :अनेक संस्थेने पगार भत्ते व इतर खर्च न घेता काम करण्याची मागणी केली आहे परंतू ते न घेता महापालिकेने जाहिरात देवून तज्ञ व्यक्तीची या पदावर नियुक्ती करावे जेणे करून महापालिकेने त्यावर कन्ट्रोल राहिल.

श्री.मुजीब खान :संस्थेच्या बाबतीत यापूर्वी सर्वसाधारण सभेने डिसाईडही केलेले आहे.जे नाव आले ते संस्थेच्या मार्फत आले. जे पुर्वी काम करीत आहे त्यांना घ्यायचे की जाहिरात देवून नवीन भरती करायचे याचे अधिकार सर्वसाधारण सभेला आहे.जोपर्यत पॉलीसी डिसाईड होत नाही तोपर्यत जे काम करतात त्यांचेकडून काम करून घ्यावे व एक ग्रथंपाल व डी.टी.पी. ऑपरेटर यांना तेथे नियुक्ती करावी.

सौ.लता दलाल :कोणत्या विभागाकडून प्रस्ताव आलेला आहे अशा प्रकारचे यापूर्वी प्रस्ताव घेतले का? घेण्याची तरतूद आहे का? आताच म्हटले सौ.शबनूर बेगम यांचे बाबतीत प्रस्ताव झालेला आहे का तसेच कलम नियम घालून प्रस्ताव मांडायला पाहिजे यात तसे दिले नाही.बाहेरील व्यक्ती मागणी करीत असेल असे प्रस्ताव घेतो कसे.प्रस्ताव येतांना संपूर्ण माहितीसह आला पाहिजे.

मा.महापौर हा प्रस्ताव नाकारण्यात येतो.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:रद्य करायचे असेल तर पुर्वी जे काम करतात त्यांना घ्यावे प्रेसला देवून मागणी करावी असेल तर पात्र कर्मचारी असावे नसता हे मौलाना आझाद कॉलेजच्या नावाने आहे याचा विचार करावा.

श्री.सलीम खान :संस्थाचे लोक काम करण्याची गॅरेन्टी नाही जे काम करतात त्यांचेकडून करून घ्यावे.

श्री.देसरडा प्रशांत :तीन जे रिसर्च सेन्टर या शहरात असून ते चालविण्यात देशातील पहिली महापालिका ही असेल. वेळोवेळी या रिसर्च सेन्टरचे प्रस्ताव येत असतात. परंतू पुढील खर्च हा महापालिकेची आर्थीक परीस्थिती पाहता करू शकणार नाही. या रिसर्च सेन्टरमध्ये संशोधन करण्यासाठी राज्य शासन किंवा केंद्र शासनाकडून अनुदानाची मागणी केली पाहिजे. तसा प्रस्ताव प्रशासनाने सादर करावा.

श्री.संजय जोशी :भारत माता मंदीर महापालिकेनेच केले ५ हजार खर्च सुध्दा झ ाालेला नाही. नाईट वॉचमन ,तसेच लाईटची व्यवस्था नाही ,रविवारी कुलूप असते.येणारे पर्यटक परत जातात.ठराविक

ठिकाणीच लक्ष न देता याकडे ही दयावे. १५ ऑगस्ट २६ जानेवारी रोजी लाईट सुरू करावी मागणी केली लावले नाही संपूर्ण रंग निघालेला आहे. जे प्रकल्प आहे ते सर्व महापालिकेचेच आहे ठराविक ठिकाणचे प्रस्ताव आणू नये. भारत माता मंदिरकडेही लक्ष दयावे. ही वास्तु कुणाच्या अंडरमध्ये येते हे सुध्दा प्रशासनाला माहित नाही.आज तेथील पाहणी करण्यासाठी नियुक्ती करावी व तेथील निगा राखण्यासाठी आदेशीत करावे.

श्री.काशिनाथ कोकाटे :भारमाता मंदीरासाठी ५ हजार खर्च करू शकत नसेल व याकडे दुर्लक्ष होत असेल तर यापेक्षा दुर्दैव कुठे नसेल असे माझे मत आहे.

मा.महापौर :प्राचार्य डॉ.मोहम्मद उमर मोहम्मद जमाल यांचा प्रतिनियुक्ती करण्याचा प्रस्ताव नाकारण्यात येतो. मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्रावर समन्वयक व सहाय्यक समन्वयक हे सर्व काम करतात पून्हः पदे जाहीरात देवून भरे पर्यंत यांनीच काम करावे अशा प्रकारची सूचना करते त्याच प्रमाणे तेथील वाचनालया करीता लिपीक व ग्रंथालय सहाय्यक ही मान्य केलेली पदे पण भरण्यास मान्यता देण्यात येते. या सोबतच स. सदस्य श्री.संजय जोशी यांनी भारत माता मंदीर संदर्भात व्यथा प्रगट केली भारत माता मंदीर हे या शहराचे व महापालिकेची एक सुंदर वास्तू आहे देशातील कदाचित दुसरे क्रमांकाचे या शहरातील भारतमाता मंदीर आहे त्या विषयी सगळयांची चांगली भावना आहे या भारतमाता मंदीर साठी कर्मचारी वर्ग दिलेला नाही असे आताच सदस्यांनी म्हटले भारत माता मंदीरसाठी सर्व प्रकारचा कर्मचारी वर्ग उपलब्ध करून देण्यात येईल त्याकरीता नाईट वॉचमन,तसेच वाचनालयासाठी लागणारा कर्मचारी, हा प्रशासनाने उपलब्ध करून दयावा.तसेच भारतमाता मंदीरातील लाईटची दुरूस्ती करावी रंगरगोंटी करावी सदर मंदीर त्या भागात आहे हे जनतेला येणा-या पर्यटकांना समजण्यासाठी एक कमान टाकावी त्या भागाकडे येणारे रस्त्यावर भारतमाता मंदीर या नावाने दिशादर्शक फलक लावण्यात यावे. याची प्रशासनाने अमंलबजावणी करावी. महापालिकेच्या ज्या ज्या ठिकाणी वास्तु आहे, तेथे आवश्यक कर्मचारी प्रशासनाने उपलब्ध करून द्यावा.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार मौलाना आझाद शिक्षण संस्थेचे औरंगाबाद कॉलेज फॉर वूमेनचे प्राचार्य डॉ.मोहम्मद ऊमर मोहम्मद जमाल यांची महानगरपालिकेचे मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्राचे समन्वयक या पदावर प्रतिनियूक्ती नाकारण्यात येते. तसेच हे पद पून्हः जाहीरात देवून भरण्यात यावे. तोपर्यंत कार्यरत कर्मचाऱ्यांना मुदतवाढ देण्यांत येते. तसेच लिपीक व वाचनालयासाठी ग्रंथालय सहाय्यक ही नियमावलीनुसार मान्य केलेली पदेही भरण्यास मान्यता देण्यात येते. तसेच महानगरपालिकेचे ज्या ज्या वास्तु आहेत, तेथे आवश्यक कर्मचारी उपलब्ध करून देण्यासही मान्यता देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**चर्चा :**

श्री.भगवान घडमोडे :अशा वास्तुवर देखरेख करण्यासाठी एक उपअभियंता व दोन जेई दुय्यम अवेक्षक असा स्टॉप देण्यात यावा.

मा.महापौर :अशा ज्या ज्या ठिकाणी वास्तु आहे त्या ठिकाणी स्टॉफ प्रशासनाने उपलब्ध करून दयावा.या तीनही रिसर्च सेन्टरसाठी राज्य शासन व केंद्र शासनाकडून अनुदान मिळू शकते का. पाहण्यात यावे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :कुठलेही अनुदान घ्यायचे असेल तर सलग्नीकरण घ्यावे लागते.विदयापीठाचे घ्यावे नसता एखादया इन्स्टीटयूटचे घ्यावे तरच शासनाकडून यासाठी अनुदान मिळेल.

श्री.देसरडा प्रशांत :एक वास्तुचा खर्च दोन ते तीन कोटी केला याचा विसर पडलेला आहे.ज्यावेळेस सभागृहाने ठराव मंजूर केला त्यावेळची भावना वेगळी असू शकते. रिसर्च सेंन्टर राज्याच्या केंद्रांच्या यादीत नाही ते टाकावे. मराठवाडा मुक्ती संग्राम मध्ये सर्व समाजाचे सहकार्य आहे भारतमाता मंदीरमध्ये स्वातंत्र सैनिकाचे फोटो लावलेले आहे ते बघायला मिळेल. संलग्नीकरण व्हायला पाहिजे वर्षभरासाठी येणारा खर्च किती याची सर्व माहिती काढावी. शासनाकडे अनुदान मागविण्याची कार्यवाही करावी.

मा.महापौर :जो मुद्या मांडला सर्वजण सहमत आहे.तीनही रिसर्च सेंन्टर व भारतमाता मंदीर या चारही वास्तुचे विदयापीठाशी सलग्नीकरण व्हावे,या बाबतीत महापालिकेचे प्रयत्न सुरू आहे. यासाठी अर्थसंकल्पात तरतूदी आहे, पूढे त्याकरीता आपण काही निर्णय घेणार आहोत. याचा सविस्तर प्रस्ताव पूढील बैठकीत येणारच आहे, परंतू जो मुद्दा मांडला तो अतिशय चांगला आहे. यात लक्ष देवून या विषयामध्ये या चार ही सेंटरचे विद्यापीठाशी संलग्नीकरण करणे या सोबतच केंद्र शासन व राज्य शासनाकडे अनुदानासाठी प्रस्ताव पाठविण्यासाठी प्रस्ताव तयार करावा. राज्य शासन व केंद्र शासनाकडे त्वरीत पाठवावा. आणि या बाबतीचा सविस्तर प्रस्तावही सादर करावा.

**<u>विषय क्र. २३८ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद शहराचे वाढीव हद्दीनुसार ९.०० मीटर ते ४५.०० मीटर रूंद विकास योजना रस्त्याची आखणी (Dermarcation and Stone Fixing) होणे आवश्यक आहे. काही भागात रेखांकनांना मंजुरी देण्यात आलेली आहे. बऱ्याच ठिकाणी तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, औरंगाबाद यांचा मोजणी नकाशा व मंजुर विकास योजना नकाशा मध्ये तफावत येते त्यामुळे रस्त्याची सलगता राहत नाही. त्यामुळे नवीन वाद उद्भवतो तरी प्रत्यक्ष जायमोक्यावर विकास योजना रस्त्याची आखणी केलेली असल्यास जमिन धारकास रस्त्याबाबत पूर्व कल्पना येईल. यासाठी रस्त्याची आखणी होणे आवश्यक आहे. यापूर्वी (१) जळगांव रोड ते स्मृतीवन (जटवाडारोड) व हॉटेल अमरप्रीत ते बीडपायपास या २४.०० मीटर रूंद रस्त्याची आखणी खाजगी एजन्सी मार्फत करून घेण्यात आलेली असून प्रती कि.मी.रूपये ९५००/- व प्रती दगड (Stone) रूपये २९७/- असा दर दिलेला आहे. त्यानुसार ९.०० मीटर ते ४५.०० मीटर रूंद रस्त्याची लांबी सुमारे १६६.०० कि.मी. आहे. करीता यासाठी रूपये ९५००/- प्रती चौ.मी.प्रमाणे रूपये १५,७७,०००/- व प्रती २००.०० मीटरवर दोन्ही बाजूने (Stone Fixing) केल्यास सुमारे २००० दगड (Stone) लागणार आहे. त्यासाठी रूपये २९७ प्रमाणे ५,९४,०००/- खर्च अपेक्षीत आहे. अशी एकुण रूपये २१,७१,०००/- खर्च अपेक्षीत आहे. सदर काम निविदा पध्दतीने खाजगी एजन्सी

मार्फत करून तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, औरंगाबाद यांचे मार्फत प्रमाणित करून घेणे बंधनकारक राहील.

करीता औरंगाबाद मंजुर विकास योजना (वाढीव हद्द नुसार) ९.०० मीटर ते ४५.०० मीटर रूंद विकास योजना रस्त्यांच्या आखणींचा प्रस्ताव आखणीसाठी लागणाऱ्या खर्चासह मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : या संदर्भात सविस्तर माहिती दयावी.

उपअभियंता(न.र)-१ :या शहरामध्ये ९ ते ४५ मीटर रूंद विकास योजना रस्त्याची खाजगी एजन्सी मार्फत आखणी करण्यासाठी हा प्रस्ताव आहे.रस्त्याची लांबी अंदाजे १६६ कि.मी.आहे.

श्री.गजानन बारवाल :शहरात कुठेही रस्त्याची डिमार्करेशन करण्याची गरज नाही ऑलरेडी मार्कीग केलेल्या आहे. डीपी रोड कुठे आहे हे सर्वांना माहित आहे स्थगित करावा.

श्री.हिम्मतराव दाभाडे:प्रति दगड २९७ रू.असे दिले दगड कोठून आणलेला आहे.एजन्सीचे नाव दिलेले नाही निविदा काढून काम देणार आहे किंवा कसे. रस्त्याचे डिमार्केशन करून साईडला दगड लावणार आहोत का.

श्री.देसरडा प्रशांत :हे काम पुर्वी कोण करीत असेल मा.जिल्हाधिकारी कार्यालयात मेजरमेंन्टचे रक्कम भरतो त्यांचे काम काय असते.

उपअभियंता(न.र)-१ :पुर्वी हे मोजणीचे काम तालुका निरीक्षक भुमी अभिलेख यांचे मार्फत करीत होतो.

श्री.देसरडा प्रशांत :भुमिअभिलेख विभाग या ड्रॉईगला मान्यता देणार आहे का?

उपअभियंता(न.र.)-१:एजन्सी त्या विभागाकडून सर्टीफाय करून घेईल.

श्री.शंशाक विसपूते :कारगील उद्यानच्या वेळी खाजगी एजन्सीने मार्कींग केले होते त्यावेळी मान्यता मिळाली नाही.

श्री.प्रशांत देसरडा :महापालिकेसाठी भूसंपादन अधिकारी आहे. त्यांना महापालिका पगार भत्ते व इतर सर्व खर्च देते. त्यांचे कार्यालय महानगरपालिकेत आणावे. ते अधिकारी कुठे व कशा पध्दतीने काम करतात त्यांची जबाबदारी काय आहे. ते काम करण्यास सक्षम नसेल तर नगररचना अधिकारी यांचेकडे चार्ज दयावा. प्रमुख कोण आहे. सहा.संचालक नगररचना विभागाचा चार्ज इतर अधिका-याकडे दयावा म्हणून निर्णय घेतला त्याचीही अमलबजावणी केली नाही. नगर रचना विभागाचा प्रमुख कोण आहे.

मा.महापौर :संबधीत विभागाचे नवीन अधिकारी येणार आहे.तसे पत्र आलेले आहे.

श्री.मुजीब खान :२१ लक्ष खर्च करीत आहे हा बॉन्ड्री फिक्स करण्यासाठी दगड रोवण्याची गरज काय यापूर्वी अशी कार्यवाही केली का महापालिकेला फायदा काय ?

श्री.सय्यद खुसरो : विकास कामे होत नाही यावर खर्च करण्याची गरज नाही रद्द करावे.

मा.महापौर :हा विषय प्रस्तावित विकास योजना रस्त्याचे महत्वाचे काम आहे या संदर्भात मा.आयुक्तांशी चर्चा करून संपूर्ण माहिती सह हा प्रस्ताव प्रशासनाने पुढील बैठकीत ठेवावा.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्तावासंबंधी मा.आयुक्तांशी चर्चा करून संपूर्ण माहितीसह हा प्रस्ताव प्रशासनाने पूढील बैठकीत ठेवणेस मान्यता देण्यांत आली.

**विषय क्र. २३९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, चंपा मस्जीद चौक ते जिल्हाधिकारी कार्यालय, ३० मी.रूंद विकासयोजना रस्त्यावर दगडीमहलजवळ नाल्यावर पुल बांधण्यासाठी कार्यवाही सुरू आहे.

या प्रस्तावासाठी आवश्यक जमीनीसाठी संयुक्त मोजणी करण्यात आलेली आहे. संयुक्त मोजणी प्रमाणे न.भू.क्र. ११३२९ बाधित क्षेत्र ४३७.०० चौ.मी. व ११३३० बाधीत क्षेत्र ६.९० चौ.मी.ही मिळकत दर्गा व सार्वजनिक कब्रस्तानाची आहे.

उक्त न.भू.क्र. ११३२९ व ११३३० या मिळकतींची भुसंपादन कार्यवाही खाजगी वाटाघाटीने किंवा विशेष भूसंपादन अधिकारी, विशेष घटक, औरंगाबाद यांच्या मार्फत झालेली नाही. म्हणजेच उक्त जागा महानगरपालिकेच्या ताब्यात नाही.

करीता उक्त जमीनीचे भूसंपादन करण्याकरीता रितसर भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचेकडे सादर करणे आवश्यक आहे. करीता वरील बाधीत क्षेत्राचा (न.भू.क्र.११३२९ बाधित क्षेत्र ४३७.०० चौ.मी. व ११३३० बाधीत क्षेत्र ६.९० चौ.मी.) भूसंपादन प्रस्ताव त्यास येणाऱ्या खर्चासह मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.मुजीब खान :सी.टी.एस.नं.११३२९,११३३० बाबत नकाशावर खुलासा नाही. प्रस्तावातील मालमत्ता कुठे येतात. या रोडवर ११३१२ न.भु.क्र.ची मालमत्ता आहे. ही एकच मिळकत येते. इतर मालमत्ता नाही मोबदला देण्याची गरज नाही किती रक्कम व कुणास दयायची प्रस्तावात दिले नाही. पुलाच्या कोणत्या बाजूस आहे, दाखविण्यात यावे.

श्री.गजानन बारवाल :जागा भुसंपादनाचा प्रस्ताव असेल तर नकाशासह माहिती सादर करायला पाहिजे स.सदस्य यांनी आताच म्हटले इतर मिळकत त्या रस्त्यावर येत नाही मोबदला देण्याची गरज नाही.

उपअभियंता(न.र.)-१:चम्पा मस्जिद ते जिल्हाधिकारी कार्यालय पर्यतचा ३० मी.रूंद रस्त्यावर या मालमत्ता बाधीत होतात. संयुक्त मोजणी नकाशा झालेला आहे.

श्री.मुजीब खान : रविद्रनगरचा लेआउट आहे त्यामधून ५०-१०० फुटाचा रस्ता क्लिअर निघालेला आहे..पुलाजवळ भुमि अभिलेख विभागाचे कार्यालय आहे.जागा कुणाची नाव उल्लेख करावा.१९८८-८९ पासून एनओसी इतर कार्यवाही होण्यासाठी मी प्रयत्न केले दर्गाच्या साईडची जागा ही पुलासाठी कनेक्ट होत नाही अलग आहे. पुला समोरील जागा सरकारी आहे. नकाशा सोबत आहे का? ११३१२ न.भु.क्र. जागा आहे त्याची चर्चा नाही परंतू दर्गाचे मालकीहक्क व पीआर कार्ड महापालिकेकडे आहे का याचा खुलासा करावा.

उपअभियंता(न.र.)-१ :हा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविणार आहोत.त्यांचे मार्फतच ही कार्यवाही होणार आहे.

श्री.मुजीब खान :११३३० न.भु.क्र. पुलाच्या कोणत्या साईडला आलेला आहे.ज्याची जागा आहे त्यांना मोबदला देण्याचा उल्लेख नाही ज्यांनी नाही

त्यांचे बाबतीत मोघम ठराव तयार करून सादर केला सदर जागेवर मार्कींग केले तो नकाशा असेल तो दाखवावा.दर्गा एक साईडला आहे हा प्रस्ताव कसा सादर केला.बाजूला दुसरा सर्वे नंबर कुठेही नाही सर्व सरकारी जागा आहे.

श्री.देसरडा प्रशांत :मा.आयुक्तांच्या निदर्शनास खालचे अधिकारी आणून देत नाही प्रस्ताव येतात मंजूर होतात नंतर मिळकत धारकाच्या तक्रारी येतात. सभागृहावर ताशेरे ओढले जाते केसेस होतात मा.न्यायालयातून जामीन मंजूर करून घ्यावा लागतो.

श्री.मुजीब खान : असे प्रस्ताव येतील त्यावेळी प्रस्तावासोबत सविस्तर नकाशा देण्यात यावा जेणे करून चर्चा करण्यास सोयीस्कर होईल. साइडवर अधिकारी यांनी पाहणी केलेली दिसून येत नाही कार्यालयात बसून कुणाच्या सांगण्यावरून प्रस्ताव तयार केला असावा प्रशासनाकडे ठोस माहिती नाही.

श्री.संतोष खेंडके :जोपर्यत सहा.संचालक नगररचना सभागृहात उपस्थित राहत नाही तोपर्यत या विभागाचे एकही प्रस्ताव घेवू नये.

श्री.अ.रशिद खान :चम्पा चौक पासून डीपी रोड नाल्याजवळ येउन संपतो. नाल्यावर पुलाचे काम चालू आहे त्यापूढे शासकीय कार्यालय त्यानंतर पुन्हा डीपी रोड मालमत्ता कुठे आहे.

श्री.संतोष जेजूरकर :या विभागाचे अधिकारी जोपर्यत येत नाही तोपर्यत या विभागाचे प्रस्ताव घेण्यात येवू नये.

श्री.प्रशांत देसरडा :प्रस्ताव आला कसा याची चौकशी करावी.

श्री.अ.रशिद खान :जर चुकीने मालमत्ता दाखवली असेल तर त्यांचेवर गुन्हादाखल करावा.

मा.महापौर : या प्रस्तावा विषयी माहिती प्रशासनाला सविस्तर देता आली नाही. कुणाचे ही समाधान झाले नाही.जोपर्यत सहा.संचालक नगररचना या सभागृहात येणार नाही तोपर्यत या विभागाचे कोणतेही प्रस्ताव या सभागृहात येणार नाही किंबहुना त्यावर निर्णय केला जाणार नाही. जी माहिती स.सदस्यांनी विचारली ती अतिशय गंभीर आहे.ज्यांना मोबदला दयायचा ती मालकीची जागा यात नाही. हे प्रकरण गंभीर आहे.याची प्रशासनाने चौकशी करावी व अहवाल माझ्‍ाकडे सादर करावा.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तुत प्रस्तावासंबंधी सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे सदरहू प्रस्तावाचे संदर्भात प्रशासनास सभागृहाचे समाधान करता आले नाही. तसेच या विभागाचे सहाय्यक संचालक,नगर रचना यांनी सभागृहात याबाबत जोपर्यंत माहिती देत नाही व सभागृहात येणार नाही,तोपर्यंत या प्रस्तावासह नगर रचना विभागाचे कूठलेही प्रस्तावावर निर्णय घेण्यात येणार नाही. असे सर्वानुमते ठरले. तसेच या प्रस्तावा संबंधी प्रशासनाने मालकी हक्क व इतर बाबतीत चौकशी करून अहवाल मा.महापौर यांचेकडे सादर करावा. त्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली.

**<u>विषय क्र. २४० :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सहाय्यक संचालक नगर रचना,महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मोहल्ला बायजीपुरा येथील न.भू.क्र.१२०९१

मधील जमिनीतून जाणाऱ्या ड्रेनेज लाईन साठी जागा संपादन करणेसाठी कार्यवाही खाजगी वाटाघाटीने सुरू आहे.

मा.स्थायी समितीच्या चर्चेअंति असे ठरले की, उक्त प्रकरण खाजगी वाटाघाटीव्दारे करणे ऐवजी विशेष भूसंपादन अधिकारी, विशेष घटक,औरंगाबाद यांच्यामार्फत करण्यात यावे.

करीता मोहल्ला बायजीपुरा येथील न.भू.क्र.१२०९१ मधील जागा ड्रेनेज लाईन करीता संपादन करणेसाठी भूसंपादनाचा रितसर प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी,औरंगाबाद यांचेकडे पाठविणेसाठी व त्यास येणाऱ्या भूसंपादन खर्चासह प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर :आताच ठरल्या प्रमाणे या विभागाचे अधिकारी उपस्थित नसल्यामूळे व हा नगररचना विभागाचा प्रस्ताव असल्यामूळे आता घेतला जाणार नाही.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्तावासंबंधी सभागृहास माहिती देण्यासाठी या विभागाचे सहाय्यक संचालक नगर रचना हे सभागृहात उपस्थित नसल्यामूळे या प्रस्तावावर निर्णय घेण्यात येवू नये, असे सर्वानुमते ठरले. त्यास सर्वानुमते मान्यता देण्यांत आली.

**विषय क्र. २४१ :**

मा.आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहे की, स्वर्ण जयंती स्वंयरोजगार योजने अंतर्गत महिला बचतगट व पर्यटनाच्या दृष्टीकोनातून बाजारपेठसाठी १ एकर जागा उपलब्ध करून देणे बाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद तथा अध्यक्ष,जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांनी दिनांक ३०.०४.२००८ अन्वये पत्र देवून विनंती केली आहे.

सद्यस्थितीत गरवारे स्टेडियमच्या पूर्वेस औरंगाबाद हट साठी जागा निश्चित करण्यात आलेली आहे. सदर जागेच्या उत्तरेस काही जागा शिल्लक आहे. याठिकाणी महिला बचत गटास जागा उपलब्ध करून दिल्यास सदरचा प्रकल्प राबविणे शक्य होईल. खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून सदरची जागा जिल्हा परिषदेस २९ वर्षासाठी भाडे तत्वावर देणे योग्य.

०१. सदरच्या जागेचा वापर केवळ स्वर्ण जयंती ग्राम स्वंयरोजगार योजने अंतर्गत स्वंय सहाय्यता बचतगट व ग्रामीण कारागीर यांनी उत्पादित केलेल्या मालाच्या विक्रीसाठीच करण्यात यावा.

०२. सदरील जागेची मालकी पूर्णतः महानगरपालिकेकडे राहील.

०३. सदरील जागेसाठी जिल्हा परिषदेने महानगरपालिकेस दरवर्षी रू. नाममात्र भाडे द्यावे.

०४. सदरील ठिकाणी बांधण्यात यावयाच्या गाळ्यांसाठी जिल्हा परिषदेने महानगरपालिकेची रितसर परवानगी घ्यावी.

०५. जिल्हा परिषद अथवा गाळेधारक सदरील गाळे/जागा कोणत्याही बँक/संस्थेकडे गहाण,तारण ठेवणार नाही अथवा एखाद्या संस्थेस दिलेला गाळा इतरांना पोटभाडेकरू म्हणून देता येणार नाही.

०६. सदर गाळे बचतगट अथवा ग्रामीण कारागीरांनाच उपलब्ध करून दिले जातील.

०७. सदर ठिकाणच्या विद्युत बिलाची तसेच इतर शासकीय करांचा भरणा करण्याची जबाबदारी महानगरपालिकेवर राहणार नाही.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.भगवान घडमोडे :जमिन देण्यास हरकत नसावी परंतू प्रकल्प राबवितांना त्याचे अटी शर्ती काय असणार आहे याची माहिती घ्यावी.बचत गटाच्या नावाखाली कोणतेही प्रोडक्शन केले जाणार नाही. नुसत्या दुकानाचा कमर्शियल वापर होईल व जो हेतू होता तो साद्य होणार नाही दर १-२ वर्षानंतर एनओसी ही महापालिकेच्या माध्यमातून दिली जावी. जेणे करून महापालिकेचे त्यावर नियंत्रण राहील आज माहिती घेवून पुढील बैठकीत हा प्रस्ताव घेण्यात यावा.

श्री.गजानन बारवाल :बचत गटासाठी गरवारे स्टेडियमची जागा योग्य नाही. फायदा न होता लॉसमध्ये जाईल काहीही फायदा होणार नाही. जिल्हा परीषदेच्या मागे औरंगपूरा भागात मोठी जागा आहे तेथे करण्याचे निर्देश दयावे.

श्री.मनमोहनसिंगओबेरॉय:गरीब लोकांना देणार आहे आपण स्कीमचा फायदा घ्यावा एक एकर मध्ये दुसरी स्कीम आणावी.

सौ.कला बोरामणीकर:स्वर्ण जयंती स्वंयरोजगार योजने अंतर्गत महिला बचत गटासाठी न ठेवता सर्व साधारण सर्व महिला बचत गटाना याचा फायदा मिळावा.

मा.महापौर : जिल्हा परिषद बचत गट यांचेतील करारनामा कसा होतो गाळे कुणास व कशा पध्दतीने दिले जाणार याबध्दल कोणतीही माहिती समोर आलेली नाही. जागेची मालकी महापालिकेची असल्यामूळे महापालिकेचा सहभाग असणे आवश्यक आहे. माहिती मागवून पूढील बैठकीत हा प्रस्ताव सविस्तर रित्या ठेवावा.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार प्रस्तुत प्रस्तावासंबंधी जिल्हा परिषद बचत गट यांचेतील करारनामा कसा होतो गाळे कुणास व कशा पध्दतीने दिले जाणार याबद्दल कोणतीही माहिती नसल्यामूळे व जागेची मालकी महापालिकेची असल्यामूळे महापालिकेचा यात सहभाग असणे आवश्यक आहे. या बाबत व इतर आवश्यक ती माहिती मागवून पूढील बैठकीत हा प्रस्ताव सविस्तररित्या ठेवावा असे सर्वानुमते ठरले. त्यास मंजूरी देण्यांत आली.

**<u>विषय क्र. २४२ :</u>**

मा.आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहे की, महानगरपालिकेच्या मालकीचे उस्मानपुरा येथील संत एकनाथ रंग मंदिर सन १९८८ मध्ये बांधण्यात आलेले असून रंग मंदिराची ९२७ आसन क्षमता आहे. सदर रंग मंदिरात वरील बाजूस चार खोल्याचे विश्रामगृह,एक कार्यालय,एक कलादालन व एक कॅन्टीन आहे. रंग मंदिरासाठी वाहनतळाची व्यवस्था स्वतंत्ररित्या करण्यात आलेली आहे. सदरचे रंग मंदिर तसेच विश्रामगृह व कलादालन महानगरपालिकेतर्फे चालविले जाते. कँटीन व वाहनतळ दरवर्षी भाडेतत्वावर चालविण्यास दिले जातात. सदर रंगमंदिर, कँन्टीन व वाहनतळापासून मागील पाच वर्षात खालीलप्रमाणे महसूली उत्पन्न प्राप्त झालेले आहे.

सन २००३-२००४ रक्कम रू.१०.४१/- लक्ष
सन २००४-२००५ रक्कम रू.०८.१५/- लक्ष
सन २००५-२००६ रक्कम रू.०९.९६/- लक्ष
सन २००६-२००७ रक्कम रू.०७.४३/- लक्ष (दि.१९.६.०६ ते १७.१२.०६ पर्यंत दुरूस्तीसाठी बंद)
सन २००७-२००८ रक्कम रू.१३.५०/- लक्ष

रंग मंदिरातील विद्युत व जनरेटरच्या इंधनापोटी प्रती वर्ष अंदाजे खर्च रक्कम रू.४.८०/- लक्ष एवढा होतो. तसेच देखभालीसाठी नियूक्ती केलेल्या कर्मचाऱ्यावर वार्षीक खर्च रक्कम रू.११.०४/- लक्ष असे मिळून रक्कम रू.१५.८४/- लक्ष खर्च होतात.

रंग मंदिर व इतर बाबींपासून मिळणारे उत्पन्न व याठिकाणी होणारा खर्च पाहता महानगरपालिकेस दरवर्षी नुकसान सहन करावे लागते. ही बाब पाहता संत एकनाथ रंग मंदिर खाजगी तत्वावर चालविण्यास दिल्यास महानगरपालिकेस आर्थिक फायदा होईल. सदरचे रंग मंदिर खाजगी तत्वावर चालवावयास द्यावयाचे झाल्यास खालील अटी शर्तीच्या अधिन राहून प्रथमतः एक वर्षासाठी खाजगी तत्वावर चालविण्यास देणे योग्य.

**अटी शर्ती :-**

०१. जास्तीत जास्त निविदा रक्कम देणाऱ्या संस्थेस/व्यक्तीस रंग मंदिर प्रथमतः एक वर्षासाठी महानगरपालिकेने ठरविलेल्या सर्व अटी व शर्तीप्रमाणे चालविण्यास देण्यात यावे.

०२. देकाराच्या २५ टक्के अनामत रक्कम व २५ टक्के राष्ट्रीयकृत बँकेची बँक गॅरंटी संबंधीताने महानगरपालिकेकडे सादर करावी. सदरची अनामत रक्कम व बँक गॅरंटी करारनामा संपल्यावर एक महिन्यानंतर संबंधीतास परत करण्यात येईल.

०३. विद्युत देयक,जनरेटर खर्च,सांऊड,म्युझिक सिस्टीम,विद्युत यंत्रणा,डिझेल यंत्रणा तसेच इमारतीची देखभाल दुरूस्ती व त्यासाठी खर्च ठेकेदारास करावा लागेल.

०४. ठेकेदारास मालमत्ता कर,पाणीपट्टी कर,अकृषीक कर,अग्निविमा तसेच इतर शासकीय करांचा संबंधीत ठेकेदारास भरणा करावा लागेल.

०५. तसेच रंग मंदिर तारण ठेवण्याचा किंवा त्यावर आर्थिक बोजा निर्माण करण्याचा अधिकार ठेकेदास राहणार नाही.

०६. संत एकनाथ रंगमंदिर हे फक्त एकवर्षासाठी करार पध्दतीवर चालविण्यासाठी देण्यात यावा.

०७. ठेका रद्द झाल्यास ठेकेदारास संत एकनाथ रंग मंदिरातील ध्वनी यंत्रणा,विद्युत व्यवस्था, खुर्च्या,इमारत सुस्थितीत परत करावी लागेल, नसता अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. तसेच ठेक्याच्या कालावधीत महानगरपालिकेच्या मालमत्तेचे काही नुकसान झाल्यास त्याची भरपाई ठेकेदारास करून द्यावी लागेल.

०८. ठेकेदारास रंग मंदिराचा वापर लॉजींग बोर्डींगसाठी वापर करता येणार नाही.

०९. महानगरपालिकेने निर्धारीत केलेल्या दराप्रमाणेच दरांची आकारणी करावी लागेल.

१०. कॅन्टीन व वाहनतळ महानगरपालिकेने ठरवून दिलेल्या दराप्रमाणेच वापरावी लागेल.

११. रंग मंदिराच्या पहिल्या मजल्यावरील विश्रामगृह व कार्यालय पूर्णपणे महानगरपालिकेच्या हक्कात राहील, ठेकेदारास त्याचा वापर करता येणार नाही.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.मनमोहनसिग ओबेरॉय:प्रस्ताव चुकीचा आलेला आहे. ही वास्तु जनतेच्या सेवेसाठीच आहे त्यांचेच येणा-या करातून वास्तू केलेली आहे ५० लक्ष खर्च केल्यानंतर बीओटीवर देणे योग्य नाही.दुसरे जागेवर कुणी बीओटीवर करण्यास तयार असेल तर हरकत नाही. नेहरूभुवन व संत एकनाथ रंगमंदीर हे बीओटीवर करू नये. यास आमचा पक्षातर्फे विरोध आहे.

श्री.सलीम खान : नेहरूभुवन व संतएकनाथ रंग मंदीर हे दोन्ही ही बीओटीवर विकासाठी देवू नये गरीब जनतेच्या कामासाठी आहे. बीओटीवर देण्यास माझा विरोध आहे.

श्री.गजानन बारवाल : सेवाभाव हे आपले आद्य कर्तव्य आहे. संत एकनाथ रंग मंदीर चांगले आहे परंतू तेथील व्यवस्थापन चांगले नाही.दिलेल्या अटी शर्तीस अधीन राहून काम करण्यास तयार असेल तर देण्यास हरकत नसावी.बाजूची पार्कींगसाठी जागा घेतली होती अदयाप महापालिकेच्या ताब्यात नाही ती आजच घेवून लगेच पुढील कार्यवाहीसाठी मंजूरी दयावी.

श्री.काशिनाथ कोकाटे :येणारा खर्च व अटी व शर्ती देवून मॅनेजमेंन्टसाठी खाजगी पध्दतीने देण्याचा प्रस्ताव ठेवला. मराठवाडयाच्या चळवळीचे हे केंद्र आहे.ही वास्तू सर्व नाटयकर्मी व सर्वसामान्य जनता यांचेशी निगडीत असल्यामूळे प्रत्येक बाब अर्थ व्यवहाराशी निगडीत ठेवली म्हणजे लॉस प्रॉफिट याचा विचार न करता तेथे स्वतंत्र असा कर्मचारी एक वर्षासाठी ठेवून त्यावर जबाबदारी देवून काम करता येईल का कमीत कमी खर्च कसा होईल हा उद्येश प्रशासनाचा असावा व त्यात सुधारणा केली पाहिजे.खाजगी एजन्सीला ही वास्तू मॅनेजमेंन्टसाठी देवू शकत असेल तर सिडको मध्ये १२००आसनचे नाटयगृह त्यावर २५-२६ कोटी खर्च स्वतत्र सांस्कृतिक सभागृह बांधण्यात आलेले आहे. ५६०० क्वे. मी.जागा उपलब्ध आहे. ३० कोटीचा तो प्रोजेक्ट आहे.सिडकोचे हस्तांतरण झाले त्यावेळेस त्या मालमत्तेसह सर्वच कम्युनिटी सेन्टर व इमारतीचे हस्तांतरण केले.दोन तीन महिण्यात ते हॅंडवर्क होवू शकते.अशी सध्याची वस्तुस्थिती आहे.हे बीओटीवर दिले तर सिडकोतील नाटयगृह देण्याची लोक मागणी करतील. २५ वर्षाच्या संघर्षानंतर सिडकोतील नाटयगृह उभारले गेले आहे. तेथील जनतेला त्यांचा लाभ व्हावा.यावर निर्णय देतांना तेथील जनतेचा सहानुभूतीपूर्वक विचार करावा जनतेला काही अडथळा येणार नाही आपण प्रशासन व्यवस्थित करावे.

श्री.रेणुकादास वैद्य :ही वास्तू माझे वार्डात येत असून अनेक रसिकासोबत मला तेथे जाण्याचा योग आला लाखो रूपये आतापर्यत खर्च केले दरवर्षी देखभाल दुरूस्तीवर खर्च होत असतो. बीओटीवर खाजगीकरण करीत आहोत असा गैरसमज झालेला दिसतो.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :एक वर्षासाठी चालविण्यास देण्यास फिजीबल नाही.

श्री.रेणुकादास वैद्य :या शहरातील रसिक, रंगकर्मीसाठी अतिशय चांगली वास्तू आहे तिचे पावित्र्य चांगले राखले जावे ती सुंदर व सुरक्षित राहावी यासाठी चांगल्या व्यक्तीकडे या रंग मंदीराचे व्यवस्थापन दयावे प्रशासनाला १०० पत्र दिले. महानगरपालिकेकडे नियुक्ती देण्यास मॅनपावर व सक्षम अधिकारी नाही सांगण्यात येते. स्वच्छता निरीक्षक या एकटया व्यक्तीकडून चांगले व्यवस्थापन राहील अशी अपेक्षा ठेवणे ही बरोबर नाही.खाजगीकरण करतो म्हणजे कुठल्या संस्थेला ते देत नाही. दोन चार लक्षचे नुकसान होते तो बोजा महापालिका पेलत नाही असा ही भाग नाही. महापालिका व्यवसाय करीत नाही कमर्शियल उद्येश असू नये हे तितकेच बरोबर आहे. येणा-या नागरीकांना चांगली सेवा देण्याचे काम महापालिकेचे आहे

वेतना वरील खर्च वाचेल शिवाय नागरीकांना चांगली सेवा मिळेल. प्रायोगिक तत्त्वावर एक वर्षासाठी देण्यास हरकत नसावी. जे कुणी सेवा देईल ती समाधानकारक नसेल तर पुन्हा महापालिकेचे व्यवस्थापन सुरू करावे.कृपया या विषयाला मंजुरी दयावी.

श्री.मुजीब खान :१९८८ साली ही वास्तू झालेली आहे याच बरोबर नेहरूभुवन आहे नागरीकांना कमी दरामध्ये येथे सुविधा मिळावी या भावनेतून ही वास्तु केलेली होती.बीओटी देणे हे शहरातील नागरीकांच्या हिताचे नाही.जनतेच्या सेवेसाठी केलेले आहे आजही सर्व सुविधा दिल्या जात आहे.नफा तोटा यांचा विचार करू नये.बीओटीवर दिल्यास महापालिकेचा किंवा सार्वजनिक कार्यक्रमासाठी घेणे अडचणीचे होईल जे रेट आहे त्यापेक्षा दुप्पट किंवा जास्त घेतले जाईल. जनतेसाठी केलेहोते जी भावना जनतेच्या मनात होती ती संपेल खाजगीकरण करून काय निष्पन्न होणार आहे. संतएकनाथ रंगमदीर असेल नेहरूभुवन असेल हे गोरगरीब व मध्यम वर्गीय नागरीकाच्या सुविधेसाठी आहे. येणारे उत्पन्न हे जनतेच्या माध्यमातूनच येते तोच खर्च त्यावर होतो. खाजगी पध्दतीने न देता महापालिकने व्यवस्थापन करावे हा प्रस्ताव रद्द करावा.

श्री.भगवान घडमोडे :सोशल ॲक्टीव्हिटीज म्हणून आपण बघावयास पाहिजे. अनेक वेळा अनुभव येतो कार्यक्रमांच्या वेळी नागरीक व्यवस्थापना संदर्भात कॉमेन्ट करतात.एकच कर्मचारी सर्व व्यवस्थापन करू शकणार नाही अटी शर्तीच्या अधीन राहून एक वर्षासाठी प्रायोगिक तत्वावर देण्यास मान्यता दयावी.

श्री.विनायक पांडे :एक वर्षासाठी प्रायोगिक तत्वावर देण्यात यावे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :महापालिकेने यावर खर्च केलेला आहे एक वर्षासाठी देणार कार्यवाही करतांना जाहिरात दिली होती का?अशी सेवा देण्यास अनेक तयार आहेत.एक वर्षासाठी न देता ३ ते ५ वर्षासाठी दयावे.जाहिरात देवून निविदा एजन्सी काय सुविधा देणार किती रक्कम महापालिकेला देणार सर्व अटी शर्ती टाकून माहिती घ्यावी. भारतमाता मंदीर, संतएकनाथ रंगमदीर नेहरूभुवन हया वास्तूमध्ये गरीब व सर्वसामान्य नागरीकांना स्वस्तात सेवा मिळावी या हेतूने केलेले आहे. नफा मिळेल ही अपेक्ष ठेवू नये जनतेच्या सेवेचा विचार करावा. महापालिकेला कार्यक्रम घ्यायचे असल्यास दुसरेचे प्राधान्यक्रम सोडून ते मिळू शकणार नाही. त्यासाठी अटी शर्ती असाव्यात.हे मंजूर करू नये यास विरोध आहे.

श्री.मिलींद दाभाडे : सर्वसामान्य नागरीकांवर अन्याय करणारा प्रस्ताव आहे. कर्मचारी चांगले काम करीत नाही हे समोर ठेवून प्रस्ताव ठेवला योग्य वाटत नाही जे कर्मचारी काम करीत नसेल त्यांचेवर कार्यवाही करावी. खाजगीकरण करण्यास आमचा तिव्र विरोध आहे.हे रद्द करावे.

श्री.कैलास गायकवाड :सध्या एका कार्यक्रमासाठी २४०० रू घेतले जाते. यात १५ते२० टक्केनी वाढ करावी तसेच स्थानिक चार कलाकार व वार्डातील सदस्य यांची कमेटी करून त्यावर त्यांचे नियंत्रन ठेवून या वास्तुची

देखभाल करावी.खाजगी करण न करता महापालिकेने व्यवस्थापन करावे.

श्री.हिम्मतराव दाभाडे :खाजगीकरणाचा तीन वर्षापासून अनुभव घेतो आहे. स्वच्छतेचे लाईटचे केले साफसफाई तसेच लाईट व्यवस्था वेळोवेळी होत नाही सर्वच कामे खाजगी तत्वावर देत असेल तर महापालिकेचे कर्मचारी यांचे काय काम आहे.गोरगरीब तेथे जातात सुविधाचा अभाव आहे तो महापालिकेने पुर्ण सुविधा दयाव्यात खाजगीकरण न करता महापालिकने चालवावे.

सौ.अजरा खान :महापालिका व्यवस्थापन करू शकते एवढी आर्थीक परीस्थिती बिकट नाही महापालिकेच्या वास्तुवर महापालिकेचे व्यवस्थापन असावे याबाबत महानगरपालिकेकडे योजना नाही का? आपण व्यवस्था करू शकत नाही का? बीओटीवर देवू नये हा प्रस्ताव रद्य करावा.

सौ.पुष्पा शिंदे : महापालिकेची वास्तु आहे. तेथील व्यवस्थापन चालविण्यास महापालिका सक्षम नाही का? स.सदस्य अधिकारी यांची कमेटी नेमावी त्यांचे नियंत्रणाखाली व्यवस्थापन चालवावे. खाजगी तत्वावर देवू नये. शाळा व गरीब लोकांना जे कार्यक्रम घ्यायचे असतात ते घेता येणार नाही.

श्री.संजय जोशी :सभागृहाच्या भावना लक्षात घेता संतएकनाथ रंग मंदीराची निगा राखली जाईल तेथे येणारे रंगकर्मीचा व येणा-या प्रेक्षकांना न्याय मिळेल.एक वर्षासाठी तरी प्रायोगिक तत्त्वावर मॅनेजमेंन्टसाठी ही वास्तु दयावी.त्या वास्तुची व्यवस्था चांगली राहिल आज ही सकाळी १० वाजेपर्यत रंगमदीर खुले होत नाही. जे आताच्या दराने देतो त्याच दराने गॅंदरींग व इतर कार्यक्रमासाठी मिळावे अशी अट ठेवून मान्यता दयावी.

श्री.संतोष जेजूरकर :व्यवस्थापनाकरिता एक वर्षासाठी देण्यास हरकत नसावी. अटी शर्ती ज्या दिल्या त्यानुसार कार्यवाही व्हावी व जे दर महापालिका ठरवून देईल त्याप्रमाणेच आकारणी करून या दुरूस्तीसह मंजूरी दयावी.

मा.महापौर : उत्पन्न कमवणे महापालिकेचा उद्देश नाही. लोकांना चांगली सेवा मिळावी. आताच म्हटल्या प्रमाणे शाळेचे कार्यक्रम व गॅंदरीग यांना माफक दराने तसेच महापालिकेच्या विविध कार्यक्रमाकरीता ही वास्तू मोफत मिळावी हा निर्णय करून ज्यांचा विरोध आहे तो नोंदवून या प्रस्तावास मंजूरी देण्यात येते.

याच वेळी मा.महापौर डायस समोर सदर प्रस्ताव मंजूर करू नये म्हणून अनेक स.सदस्य मोठमोठयाने मागणी करतात काहीही स्पष्ट ऐकू येत नाही.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय :
श्री.मुजीब आलम शाह } मतदानाला टाकावे.

मा.महापौर : निर्णय झाला आहे.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार, महानगरपालिकेच्या मालकीचे उस्मानपुरा येथील संत एकनाथ रंग मंदिराचे मिळणारे उत्पन्न व याठिकाणी होणारा खर्च पाहता महानगरपालिकेस दरवर्षी नुकसान सहन करावे लागत असल्यामूळे,संत एकनाथ रंग मंदिर खाजगी तत्वावर चालविण्यास देणे करीता प्रस्तुत प्रस्तावातील अ.क्र.०१ ते ११ अटी शर्तीच्या अधिन राहून तसेच महापालिकेच्या विविध कार्यक्रमाकरीता ही वास्तू मोफत मिळावी

व शाळांचे कार्यक्रम व स्नेहसंमेलनासाठी माफक दराने देणे यासह प्रथमतः एक वर्षासाठी खाजगी तत्वावर चालविण्यास देणेस मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४३ :**

आयुक्त,महानगरपालिका,यांच्याकडून प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सिध्दार्थ उद्यान येथील प्राणी संग्रहालय मौ.मिटमिटा येथील गट क्र.३०७ मध्ये स्थलांतरीत करण्याचे दृष्टीने सदरील गट क्र.३०७ मधील महाराष्ट्र शासनाच्या मालकीच्या एकूण जमिनीपैकी ४० हेक्टर जमीन महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्याबाबत प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

सदरील प्रस्तावाच्या अनुषंगाने मा.उपसचिव,महाराष्ट्र शासन यांनी या संदर्भात पूढीलप्रमाणे अटी विहीत केलेल्या आहेत व अभिप्राय मागविले आहेत.

अ. ४० हेक्टर जमिनीचे रू.२,९१,६०,०००/- मुल्याकंनाकरीता बी.ओ.टी. तत्वावर महानगरपालिका आणि शासन यांचे नियंत्रणाखाली देण्यात यावे.

ब. वरील मुल्य हेच शासनाचे भागभांडवल असेल वत्यानुसार शासनासही लाभांश द्यावा लागेल.

क. निविदा मागविणे व अनुषंगीक इतर कार्यवाही औरंगाबाद महानगरपालिकेने करावयाची आहे.

करीता उपरोक्त अटीनुसार प्रकल्पासाठी घेण्यात येणाऱ्या शासनाच्या जमीनीच्या मोबदल्यात शासनाचे equity participation गृहीत धरून सदरील प्रकल्पामधून अपेक्षित नफ्यामध्ये महानगरपालिका औरंगाबाद व महाराष्ट्र शासन यांचा प्रत्येकी ५०% हिस्सा राहील, याप्रमाणे अभिप्राय शासनास कळविणेसाठीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.संतोष जेजूरकर :रद्द करण्यात यावे.

मा.महापौर :अगोदरच्या विषयावर निर्णय दिलेला आहे सर्वांच्या भावना ऐकूण घेतलेल्या आहे कृपया सर्वांनी आपआपल्या जागेवर बसावे.

याचवेळी मा.महापौर डायससमोर अनेक स.सदस्य मोठमोठयाने बोलत होते.

मा.महापौर : सरकारी जमिन सार्वजनिक वापरांसाठी महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम (सरकारी जमिनीची विल्हेवाट) नियम १९७१ प्रमाणे मोफत व महसूल मुक्त मिळते. तशी मागणी करावी. व झु शिफ्ट करण्यांत यावे. या दुरूस्तीसह या विषयास व विषय पत्रिकेवरील संपूर्ण विषय,पूरवणी विषय पत्रिकेस काही ऐनवेळचे विषय काही दुरूस्त्यासह मंजूर करण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार, प्राणी संग्रहालय हा सार्वजनिक वापर असून सरकारी जमिन ही सार्वजनिक वापरासाठी महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम (सरकारी जमिनीची विल्हेवाट) नियम १९७१ च्या तरतूदीप्रमाणे सार्वजनिक प्रयोजनासाठी मोफत व महसूल मुक्त मिळते त्यानुषंगाने तशी मागणी करणेस व सिध्दार्थ उद्यान येथील प्राणी संग्रहालय मौ.मिटमिटा येथील गट क्र.३०७ मध्ये स्थलांतरीत करणेस व सदरील गट क्र.३०७ मधील महाराष्ट्र शासनाच्या मालकीच्या एकूण जमिनीपैकी ४० हेक्टर जमीन महानगरपालिकेकडे मोफत व महसूल मुक्त हस्तांतरीत करून घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४४ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहेत की, प्रभाग क्र.३५ अंतर्गत गरमपाणी, बारापुल्ला व कोहिनुर कॉलनी भागातील रस्त्याचे डांबरीकरण करणे, या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.२७,४८,६१०/- चे तयार करण्यात आले होते. यास मा.सर्वसाधारण सभा दि.२०.१२.०७ विषय क्र.१९ नुसार मान्यता मिळालेली आहे. तसेच सदरील कामाच्या निविदेस दि.१५.०३.२००८ विषय क्र.४५८ अन्वये मा.स्थायी समिती सभेने मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांच्याकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६.९९ % जास्त दराने करून घेण्यास मान्यता मिळालेली आहे.

सदरील काम करतेवेळेस गरमपाणी येथील स्वीमींग पूल येथे आंतरराज्य स्वीमींगच्या पोलीस विभागाच्या स्पर्धा असल्याने स्वीमींग पूल समोरील मोकळ्या जागेतही डांबरीकरण करणे बाबात प्रत्यक्ष स्थळपाहणी केल्यानंतर व प्रभागाचे स.नगरसेवक यांच्या समवेत झालेल्या चर्चेत निर्देश प्राप्त झाले होते. सदरील भागातील डांबरीकरण करण्याचा मूळ अंदाजपत्रकात समावेश नसल्याने मूळ अंदाजपत्रकात रक्कम रू.२,४५,८४५/- ची वाढ होत आहे. त्यामूळे सदरील कामाची सुधारीत अंदाजपत्रकाची रक्कम रू.२९,९४,४५५/- होत आहे. यास मा.सर्वसाधारण सभेची मंजूरी घेणेबाबत शिफारस केलेली आहे.

तरी कामाच्या मुळ अंदाजपत्रकास सक्षम सभेची किंवा सक्षम अधिकारी यांची प्रशासकीय मंजूरी प्राप्त झाल्यानंतर प्रत्यक्षात काम करतेवेळी काही अपरिहार्य कारणास्तव वाढ होत असल्यास अशा कामांच्या बाबतीत सार्वजनिक बांधकाम संहितेच्या परिच्छेद क्र.१३४ नुसार प्रशासकीय मंजूरीपेक्षा १०% पेक्षा कमी वाढ होत असल्यास सुधारीत मंजूरीची आवश्यकता नसून ही वाढ १०% पेक्षा जास्त होत असल्याने त्यास सक्षम सभेची किंवा सक्षम अधिकारी यांची सुधारीत मंजूरी प्राप्त करण्याचे आदेशित केले आहे.

तरी अशा प्रकारचे धोरण निश्चित करणेस्तव व उपरोक्त सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रू.२९,९४,४५५/- चा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजूरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.३५ अंतर्गत गरमपाणी, बारापुल्ला व कोहिनुर कॉलनी भागातील रस्त्याचे डांबरीकरण करणे, या कामाचे सुधारीत र.रू.२९,९४,४५५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

## स.सदस्यांचे प्रस्ताव

**विषय क्र. २४५ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, रहिवासीयांच्या सुविधासाठी ०१.जिन्सी चौक ०२.राजाबाजार चौक ०३.तापडिया सर्कल ०४.मोंढा चौक या चौकात हायमास्ट लाईट बसविण्याचे कामास मंजूरी मिळण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्री.अशरफ युनूस मोतीवाला

अनुमोदक : ०१.श्री.अ.साजेद अ.सत्तार,०२.श्री.स.खुसरो बुऱ्हानोद्दीन

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, ०१.जिन्सी चौक ०२.राजाबाजार चौक ०३.तापडिया सर्कल ०४.मोंढा चौक या चौकात हायमास्ट लाईट बसविण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४६ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, रंगारगल्ली येथील गायत्री चाट भांडार ते सिटी चौकपर्यंत या रस्त्यास औरंगाबाद नगर परिषदेचे सन १९५२ ते १९६७ पर्यंत नगरसेवक

असलेले व काही काळ उपनगराध्यक्ष असलेले कै.आसाराम काकाजी मुगदिया यांचे नाव द्यावे असे येथील भागातील नागरीकांची मागणी आहे.

करीता उपरोक्त रस्त्यास कै.आसाराम काकाजी मुगदिया मार्ग असे नांव देण्याबाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.किशनचंद तनवाणी,डॉ.भागवत कराड    अनुमोदक : श्री.संतोष जेजुरकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, रंगारगल्ली येथील गायत्री चाट भांडार ते सिटी चौकपर्यंत या रस्त्यास कै.आसाराम काकाजी मुगदिया यांचे नाव देणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सर्वसाधारण सभा दिनांक १६/०२/२००८ विषय क्र.१३० अन्वये मालमत्ता कर आकारणी करीता सन २००७-२००८ चे दर निश्चित करण्यासाठी प्रस्ताव मंजुर केलेला असून दर निश्चिती करतांना प्रस्तावातील अनुक्रमांक ४ मध्ये मालमत्ता नामांतर शुल्क (खरेदी/विक्री) किंमतीवर किंवा Ready Reckner दरावर (या मध्ये जे अधिक असेल ते) १% घेणेत यावे. अशी मंजुरी देण्यात आलेली आहे.

नामांतरासाठी आकारणी होत असलेली ही रक्कम अत्यंत जास्त आहे. यापुर्वी प्रचलीत पध्दतीप्रमाणे रू.५००/- शुल्क नामांतरासाठी घेण्यात येत होते. Ready Reckner च्या किंमतीवर १% शुल्क आकारणी जास्त होत असल्याने जनतेमध्ये असंतोष व्यक्त होत आहे. यामुळे लोकांची नामांतर करून घेण्याची प्रवृत्ती कमी होईल व मनपा चे उत्पन्न वाढण्याऐवजी घटेल. यासर्व बाबींचा विचार करून नामांतर शुल्क Ready Reckner च्या किंमतीवर १% ऐवजी ०.१% टक्के किंवा ५००/- रू. यापेक्षा जे जास्त असेल ते आकारण्यात यावे.

करीता प्रस्ताव मंजुरीसाठी सर्वसाधारण सभेत सादर.

सुचक : श्री.मुजीब आलम शाह खान    अनुमोदक : श्री.कोकाटे काशिनाथ हरीभाऊ

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सर्वसाधारण सभा दिनांक १६/०२/२००८ विषय क्र.१३० अन्वये मालमत्ता कर आकारणी करीता सन २००७-२००८ चे निश्चित केलेले दर प्रस्तावातील अनुक्रमांक ४ मध्ये मालमत्ता नामांतर शुल्क (खरेदी/विक्री) Ready Reckner च्या किंमतीवर १% ऐवजी ०.१% टक्के किंवा ५००/- रू. यापेक्षा जे जास्त असेल ते आकारण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४८ :**

औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे प्रति वर्षी विविध खेळाच्या महापौर चषक स्पर्धा घेण्यात येतात. त्यानुसार यावर्षी सन २००८-०९ च्या अर्थसंकल्पातील महापौर चषक स्पर्धेसाठी राखीव ठेवण्यात आलेल्या तरतूदी मधून राज्यस्तरीय महापौर चषक योगासन स्पर्धा औरंगाबाद जिल्हा योग संघटनेच्या सहकार्याने घेण्यात याव्यात करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेपूढे मंजूरीस्तव सादर.

सुचक : सौ.विमलताई बेंद्रे

अनुमोदक : सौ.शोभा मिटकर, श्री.संतोष खेंडके, श्री.महेश माळवतकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २००८-०९ च्या अर्थसंकल्पातील महापौर चषक स्पर्धेसाठी राखीव ठेवण्यात आलेल्या तरतूदी मधून राज्यस्तरीय महापौर चषक योगासन स्पर्धा औरंगाबाद जिल्हा योग संघटनेच्या सहकार्याने घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४९ :**

